गुरूवार, ९ मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१९१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 09 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-191 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टैंड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टैंड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# जनताच यांची होळी करेल

## उद्धव ठाकरे : पत्रकारांशी संवाद साधत भाजपवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : देवेंद्र फडणवीस जे म्हणाले की, काही लोक ३६५ दिवस शिमगा करतात. हे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या पक्षातल्या लोकांबाबतच केले असेल कारण त्यांच्या पक्षातले काही लोक ठाकरेंच्या विरोधात रोज बोलत आहेत. ते रोज शिमगा करत असले तरीही मी सोशल मीडियावर पाहिले कुणीतरी मुंबईत ५० खोक्यांची होळी केली. त्यामुळे आमच्या नावाने रोज शिमगा केला तरीही जनताच आता यांची होळी करेल, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. बुधवारी उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीची बैठक विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या दालनात झाली. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.**



यावेळी उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, सूड भावनेतून विरोधकांवर आरोप केले जात आहेत. तसंच भाजपाच्या विरोधात जे बोलतात त्यांना तुरुंगात जावे लागते. आमच्यातलेही जे लोक पक्षात घेतले आहेत त्यांच्यावर काय गोमूत्र शिंपडले का ? ते काय शुद्ध झाले का ? आत्ता आमच्या लोकांच्या मागे लागला आहात ते जर तुमच्या पक्षात आले तर पवित्र झाले असे जाहीर करणार का ? भाजपाचा हा सत्तापिपासूपणा आहे, तो लोकांना समजला आहे, असे म्हणत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपावर कडाडून टीका केली आहे.

यावेळी उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून विरोध करणाऱ्यांना बेजार करायचे. आमच्या पक्षात या किंवा तुरुंगात जा हे धोरण वापरायचे. हर्षवर्धन पाटील मध्यंतरी बोलले होते ना भाजपात आलो आता मला शांत झोप लागते तशी अवस्था करायची. मध्यप्रदेशच्या मंत्र्यानेही विरोधकांना दम दिला की भाजपात या किंवा कारवाईच्या बुलडोझरला सामोरे जा. आता जनतेच्या मताचा बुलडोझर भाजपावर चालल्याशिवाय राहणार नाही असे उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. तसेच हे सगळे जाणीवपूर्वक चालले आहे. विरोध करणाऱ्यांना नाहक त्रास दिला जातो आहे. आमच्यातले इतके लोक त्यांच्यासोबत गेले त्यांच्यावर आरोप करणारे भाजपाचेच लोक होते. आता ते गप्प आहेत ? जे आमच्यासोबत आहेत जे भाजपाच्या विरोधात बोलतात त्यांना बदनाम केले जाते आहे, त्यांच्यामागे केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा लावला जातो आहे असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतेच असे वक्तव्य केले आहे की मतभेद, मनभेद विसरा. देवेंद्र फडणवीस म्हणाले आम्ही आमच्या विरोधकांना माफ केले. यानंतर चर्चा सुरू झाली आहे ती शिवसेना आणि भाजपाच्या पॅचअपची. त्यात किती तथ्य आहे का, असे विचारले असता उद्धव ठाकरे म्हणाले, पॅच अप करायचे म्हणजे काय करायचे ? माझ्याकडे कुठलाही प्रस्ताव आलेला नाही, त्यांच्या मनात काय आहे ? ते एकदा त्यांनाच विचारा, असे उत्तर उद्धव ठाकरे यांनी दिले.



# फडणवीस यांच्यासोबत वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर वसंत मुंडे यांची चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मुंबईत सागर निवासस्थानी भेट घेऊन वृत्तपत्रांच्या अर्थकारणावरील माहिती पुस्तीका भेट दिली. वृतपत्र व पत्रकारांच्या प्रश्नांनावर यावेळी सविस्तर चर्चा केली. वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर राज्यभरात स्वतंत्र सहा अधिवेशने घेऊन पहिल्यांदाच लोकाश्रय मिळवण्यासाठी सुरू केलेल्या प्रयत्नाबाबत फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. सरकारकडून लघु वृत्तपत्रांना अधिकची काय मदत करता येऊ शकते याचा विचार करेल, अशी ग्वाही दिली. यावेळी दैनिक आधुनिक केसरीचे मुख्य संपादक डॉ. प्रभू गोरे यांची उपस्थिती होती. समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अडचणीत असलेला वृत्तपत्र- व्यवसाय कोरोनामुळे अधिकच डबघाईला आला. जाहिरातींचा ओघ कमी झाल्याने साखळी वृत्तपत्रासह छोट्याही वृत्तपत्रांचे आर्थिक गणित बिघडले. उत्पादन खर्चाच्या तीस टक्के किंमतीत घरपोहोच वृत्तपत्र देण्याचे पारंपरिक धोरण; त्यात कोरोना, ऑनलाईन वाचनाची सवय यामुळे आर्थिक संकट ओढावले आणि काम करणाऱ्या पत्रकारांना पगारकपातीला सामोरे जावे लागले. अनेकांना तर नोकरीही गमवावी लागली. अशा परिस्थितीत वसंत मुंडे यांनी औरंगाबादमध्ये संपादकांची पहिली गोलमेज परिषद व राज्यातील विविध भागात सहा अधिवेशने घेऊन वृत्तपत्रांनी आर्थिक आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले. मागील वीस वर्षांत पेट्रोल ३० रुपयांवरुन १२० रुपये, तर डिझेल १६ रुपयांवरुन ९७ रुपये लिटर झाले.

एक रुपयाचा चहा दहा रुपये झाला. छपाईचा कागद २५ रुपयांवरुन १०० रुपयांपर्यंत झाला. सरकारने जाहिरातीवर व इतर वस्तूंवर ५ टक्के जीएसटी आणि इतर कर लावल्याने किंमती पाच पटीने वाढल्या. असे सर्व वस्तूंचे भाव वाढत असताना वर्तमानपत्रांच्या किमतीत मात्र एक पटीनेही वाढ झाली नाही. आजही ८ ते १२ पानांची वर्तमानपत्रेही दोन ते पाच रुपयांत घरपोहोच दिली जातात. त्यामुळे उत्पादन खर्चाच्या २० टक्के विक्री किंमत असणारे हे जगातील एकमेव उत्पादन आहे. जाहिराती कमी झाल्याने तोटा भरुन काढण्याचा अशक्य असल्याने विक्री किंमत वाढवण्याचे गणित वृतपत्रांचे मालक, संपादक, वितरक यांना पटवून दिले. या सर्व मुद्यांवर यावेळी वसंत मुंडे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली.

# ग्रामीण भागातील 'आसाळीला' आजही महत्त्व

## विविध देवतांची स्तुती करून गायन

आधुनिक केसरी न्यूज


बंडू खडांगळे

लखमापूर : दिंडोरी तालुक्यातील आजही असंख्य गावांमध्ये धुलीवंदन सण जुन्या पारंपरिक पध्दतीने साजरा करण्याची प्रथा आहे. त्यामध्ये सर्वाचे आकर्षण ठरते ती सोंग घेणारी आसाळी. धुलीवंदनाच्या दिवसी दुपारनंतर गावांतून देवघरातील वीर देवतेची विविध वाद्यांच्या गजरात भव्य दिव्य स्वरूपात मिरवणूक काढली जाते. त्यामध्ये लहान मुलांना विविध रंगीबेरंगी वस्त्रांनी नटवले जाते. हातांमध्ये देवघरातील वीर देवता खोबऱ्याची वाटी घेऊन लाल वस्त्रात ती बांधून गावांतून मोठ्या प्रमाणावर नाचत मिरवणूक काढली जाते. याला ग्रामीण भागात ' विर मिरवणूक " म्हणून ओळखले जाते. यामध्ये जुने लोक जुन्या पध्दतीचे शास्त्रीय गाणे, पदे व विविध देवतांची स्तुती करून गायन करतात. व गाणे संपले की तोंडावर हात मारून 'बोंबला रे बोंबला'अशी मोठ्याने गर्जना करतात. वातावरणातील दोन दिवसांपासून पावसाळी स्थिती निर्माण झाल्याने या सणांवर थोड्याफार प्रमाणांवर विरर्जन पडले असले तरी काही भागात मोठ्या प्रमाणात हा उत्सव पारंपरिक पध्दतीने साजरा करण्यात आला. धुलीवंदन म्हटले की बाळगोपाळांचा आवडता सण कारण वीर मिरवणूकीमध्ये विविध रंगीबेरंगी वस्त्र परिधान करून विविध रूप घेऊन गावांतील मिरवणूक ही

> ग्रामीण भागात आजही विविध सणांना पुर्वी इतके च महत्त्व आहे . या सणांमुळे ग्रामीण भागातील एकेपा , संघटीत पणा, व संस्कृती यांचे दर्शन या रूपाने ग्रामीण भागात पाहायला मिळत असते . दिंडोरी तालुक्यातील अनेक गावांमध्ये या सणांचे महत्त्व पुर्वी इतकेच आहे . त्यामुळे नागरिक हे सण मोठ्या प्रमाणावर आनंदाने साजरे करताना दिसतात .
> गंगाधर निखाडे ( सरपंच, ओझरखेड ता .दिंडोरी )

जनतेच्या आनंदात भर घालणारी ठरत असते. त्यामुळे या सणाला ग्रामीण भागात आजही पुर्वी इतकेच महत्त्व कायम आहे. यासणांमध्ये दुसरे महत्त्वाचे स्थान म्हणजे ज्याला ग्रामीण भागात कोणी आसाळी, तर कोणी डंसनडुकरी या नावाने एक पात्र पुढे येते. यासाठी दोन माणसे गावांतून घेतले जातात. त्यांना काळे वस्त्र परिधान केले जाते. चेहऱ्यावर विविध रुपाचे मुखवटे घातले जातात. कंबरेला घुंगरू व हातात झाडू व एका हातात काठी किंवा मुसळ घेऊन हे आसाळी पात्र केले जाते. वीर मिरवणूक संपली की लगेच आसाळी मिरवणूक निघते. नागरिकांच्या डोक्यावर झाडु ठेवून ही आसाळी गावातील नागरिकांकडून व प्रत्येक घरांतून दान दक्षिणा, घेत असतात. यामध्ये लहान मुले या आसाळी मागे धावत असतात व या सणाचा मनमुराद आनंद घेत असतात. मागील काही वर्षी कोरोनामुळे अनेक सणांवर संकट कोसळले होते. परंतु आता प्रत्येक ठिकाणी सण मोठ्या प्रमाणावर साजरे होऊ लागल्याने आनंद व्दिगुणीत झाला आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी..' असे प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राने आपल्या आईचा आणि मातृभूमीचा गौरव करताना म्हटले आहे. त्यात आपल्या मातृभाषेचा समावेश करायला हरकत नाही. ज्ञानेश्वर माउलींनी तर म्हटलेच आहे-

**माझा मऱ्हाटाची बोलू कवतुके परी अमृतातेही पैजा जिंके**
**ऐसी अक्षरे रसिके, मेळवीन** मराठी भाषेतील थोर लेखक, कवी, नाटककार कुसुमाग्रज उर्फ वि वा शिरवाडकर यांचा जन्म दिवस मराठी भाषा दिन म्हणून जगभर साजरा होतो. जगाच्या कान्याकोपऱ्यात जिथे कुठे मराठी माणूस असेल तो अभिमानाने हा दिवस साजरा करतो. मराठीची आठवण करतो, मायभूमीची आठवण करतो. ही मराठी माती इतकी पवित्र आहे की कुसुमाग्रज म्हणतात...

**माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा**
**हिच्या संगाने जागल्या दऱ्याखोऱ्यातील शिळा.** मराठी भाषेतील अभंग असो वा ओवी, तिला सुभाषिताचे मोल प्राप्त झाले आहे. रत्नजडीत अभंग, ओवी अमृताची सखी चारी वर्णातुनी फिरे, सरस्वतीची पालखी. या आमच्या मायमराठीला हजारो वर्षांचा इतिहास आहे. या अर्थाने माझी मराठी ऐतिहासिक आहे, अक्षर आहे, अभिजात आहे. आई जसे आपल्या बालकाचे पालनपोषण करते, तसे या मराठीने तुमचे आमचे पोषण केले आहे. हजारो वर्षांपासून. ते स्तन्य पाजून तिने आपल्याला बळ प्रदान केले आहे. आपले सांस्कृतिक वैभव वाढवले आहे. तिच्या अंगाखांद्यावर खेळतच आपण मोठे झालो आहोत. मग तिला कसे विसरता येईल... माधव ज्युलियन यांच्या शब्दात सांगायचे झाले तर मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ही राजभाषा नसे. नसो आज ऐश्वर्य या माऊलीला, यशाची पुढे दिव्य आशा असे. हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू, वसे आमुच्या हृन्मंदिरी.



## आनंदी पहाट

## कलाकृतींचे शास्त्र शिकण्याची गरज

आधुनिक केसरी

आपल्या संकृतीचं दर्शन आपल्या कलाकृतीतून प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार होणं योग्य ठरत असून देखील, त्याची जाणीवच न होणाऱ्या कलेचं सादरीकरण करणाऱ्यांना उणिव संपन्नच म्हणावं लागेल. आपल्या देशाला कलाक्षेत्रात खूप मोठा वारसा लाभलेला असून देखील त्याची जपणूक करणं जरुरीचं का आहे ? हेच सर्वप्रथम शालेय जीवनापासून शिकवलं पाहिजे, बालवयातच प्रत्येकाच्या अंतर्मनावर कोरलं गेलं पाहिजे. आपल्या प्रत्येकाला नेहमीच काहीतरी वेगळं करायची इर्षा असते. अर्थात ती असायला देखील काहीच हरकत नाही; परंतू आपण आपल्या देशाच्या ऐतिहासिक कलांचे वारसदार आहोत ह्याचा स्वाभिमान देखील बाळगला पाहिजे. निदान आपण कलांचे वारसदार असल्याची जाणीव तरी व्हायला पाहिजे. नव्यानं जन्माला आलेली प्रत्येक पिढी ही अनुकरणप्रिय असते. कलाकृतीचं शास्त्र आणि त्याचा वारसा जर आपणच पुढे चालू ठेवला तरच पुढील पिढी देखील अनुकरणीय कृतीतून आपल्या कलेच्या संकृतीचं जतन करेल. आधी केलं आणि मगच सांगितलं, असेच विचार, वर्तन आणि व्यवहार आपण अंगीकारत असल्यावर आपल्या पुढील अनेक पिढ्या प्रत्येक कलाकृतींच्या शास्त्राचा विचार, अभ्यास आणि त्यांचं जतन केल्याशिवाय राहणार नाही. साकारण्यात येणारी प्रत्येक कलाकृती ही विकृतीचं नाही तर आपल्या संकृतीचं दर्शन घडवून कलाकृतीच्या शास्त्राची जपणूक करत राहील. भारतीय संस्कृतीतील प्रत्येक कलांचा संबंध आपल्या मानसिक स्वास्थ्याशी असल्याचं समजून घेतलं पाहिजे. आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणे आणि ते टिकवणे हे प्रत्येक शास्त्रीयदृष्ट्या आत्मसात केलेल्या प्रत्येक कलांच्या माध्यमातून शक्य होत असतं. एकप्रकारे आंतरिक उर्जा त्याद्वारे आपल्याला प्राप्त होत असल्याची जाणीव आपण करून घेतली पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## जाण तेच द्वार | मोक्षाचे रे ||

घातली गवांदी | चोरोनिया धान ||
मोक्षाचे साधन | लाभेल का ? ||१||
दीन-दुबळ्यांची | नको तळतळ ||
त्यापरी निर्मळ | अर्धपोटी ||२||
ध्यानी ठेव जीवा | वर्म जीवनाचे ||
आपुल्या कर्माचे | लाभे फळ ||३||
म्हणूनी सांगती | संतजन सारे ||
निष्काम करा रे | कर्म एक ||४||
सत्कर्म शिदोरी | पुण्याचे कोठार ||
जाण तेच द्वार | मोक्षाचे रे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**विस्मरेयं न पादौ ते क्षणमेकं हि रेणुके।**
**सुखे भवतु ते दृष्टिः ममोपरि च मातृके॥1॥**
**हे रेणुके, एक क्षण ही मी तुझ्या चरणांना विसरू नये. हे माते, सुखात (मी सुखात असताना) तुझी दृष्टी माझ्यावर ठेव.**
**अल्पे प्राप्ते सुखेऽपि त्वां**
**विस्मरिष्यामि मे भयम्।**
**अभयदायिनी साक्षात्दू रीकुरुष्व मे भयम्॥2॥**
**अल्प ही सुख लाभले असता तुला विसरेन असे भय मला वाटते. तू साक्षाद् अभयदायिनी आहेस. माझे भय दूर कर.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**मन स्वरुप शैतान को, बिन मारे नहिं शान्त। भजन तजन कुछ नहिं वने, दुखमय जीवन अन्त ।।३०।।(स्वर्वेद प्रथम मण्डल दशम अध्याय) ०१/१०/३० मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** मनरूपी सैतानाला मारल्याशिवाय म्हणजेच दूर केल्याशिवाय आत्मा कधीही शांत होऊ शकत नाही. मनाच्या संबंधामुळे जीव शुभाशुभ कर्मांद्वारे सुख-दुःखाचा उपभोग करतो. मन असता भजन होऊ शकत नाही, कारण हे मन आपल्या विषय चंचलतेला सोडत नाही. म्हणूनच मनाच्या संकल्प-विकल्प, उपद्रव तसेच अशांतीमधे राहून या दुःखमय जीवनाचा अंती विनाश होतो. म्हणजेच मनुष्य जीवन व्यर्थ विषय उपभोगात पडून नष्ट-भ्रष्ट होऊन जातं. अध्यात्मिक जीवनच त्याग, तपस्या, सदाचार तसेच इंद्रिय निग्रहाने शुध्द आणि संस्कारी होऊन पुढे विकासाच्या मार्गावर चालू लागते आणि आत्म्याचे पवित्र उत्थान होते.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**


# प्रपंच जरुरीपुरताच करावा

आधुनिक केसरी



पुष्कळ लोक जोडधंदा करतात; म्हणजे, त्यांचा एक मुख्य धंदा असतो, आणि त्याला मदत म्हणून दुसरा धंदा करतात. त्यांचे सर्व लक्ष मुख्य धंद्याकडे केंद्रित झालेले असते. म्हणजे, जोडधंद्यामुळे जर मुख्य धंद्यात व्यत्यय येऊ लागला तर तो जोडधंदा जरुरीप्रमाणे बंदही करतात किंवा नफा-नुकसानीचा प्रसंग आला तर जोडधंद्यातल्या नफा-नुकसानीकडे विशेष आस्थेने पाहात नाहीत. प्रत्येक माणसाने परमार्थ हा मुख्य धंदा ठेवून, प्रपंच हा जोडधंदा म्हणून करावा; म्हणजेच प्रपंचात होणाऱ्या लाभहानीचा परिणाम भगवंताच्या अनुसंधानावर होऊ देऊ नये. परमार्थाच्या आड प्रपंच न येईल अशा युक्तीने वागावे. भाजीला जसे मीठ लागते तसा परमार्थाला प्रपंच लागतो. मीठ नसेल तर भाजी आळणी लागते, पण मीठ जास्त झाले तर भाजी खाववत नाही. त्याचप्रमाणे प्रपंच आणि परमार्थ यांचा संबंध आहे. काही लोकांना सवयीने मीठ जास्त लागते, तसे ज्यांना प्रपंचाची सवय झाली आहे, त्यांना तो जास्त लागतो. त्यांची गोष्ट निराळी, पण ज्यांना प्रपंच नवीन सुरू करायचा आहे, त्यांनी तरी तो बेतानेच करावा. भगवंत डोळ्यांपुढे ठेवून वागावे. प्रपंचात व्यवहार जतन करावा खरा, पण प्रपंच हाच काही सर्वस्व नव्हे. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी तो बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्यामुळे तो होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे होवो. प्रत्येकाला प्रपंचाची अत्यंत जरुरी आहे; पण आपण त्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देतो, आणि त्यामुळे सर्व बिघडते. प्रपंच पाहिजे आणि दुःख नको असे म्हणणे वेडेपणाचे आहे. मूल असेल तर ते कधी तरी आजारी पडायचेच. प्रपंच हा कुणाला सुटला आहे ? हा प्रपंच, हा संसार भगवंतानेच उत्पन्न केला आहे तर तो कुणाला तरी सुटेल का ? तसा नुसता प्रपंच तापदायक नाही, तर आकुंचित प्रपंच हा तापदायक आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या या खिशातले पैसे त्या खिशामध्ये ठेवतो, त्याचप्रमाणे प्रपंचातले आपले मन काढून भगवंताकडे लावावे; तसे करण्यात समाधान आहे. नवरा-बायकोचे ध्येय एकच असेल तर त्यांचा प्रपंच सुखाचा होतो. जो मनुष्य हौसेने प्रपंच करील, त्याला तो करायला चोवीस तासही पुरणार नाहीत; पण जो जरुरीपुरता प्रपंच करील, त्याला तीन-चार तास पुरतील. प्रपंचामध्ये कर्तव्याला चुकू नये, पण त्यामध्ये आसक्तीने गुंतून राहू नये. आपले व्यवहाराचे कर्तव्य मनापासून केल्यानंतर त्याचे फळ रामाकडे सोपवावे. रामाचे नाव शक्य तितके घेऊन, आपले मन त्याच्या ठिकाणी चिकटावे यासाठी त्याची मनापासून प्रार्थना करावी. **आजचे बोधवचन आहे -** प्रपंच हा मोडक्या वस्तू नीट करण्याचा कारखाना आहे. तिथे मोडक्या वस्तू जितक्या जास्त असतील तितकी शिकणाऱ्याला संधी जास्त असते.

## काव्य-चरितावली



पुष्प १७वे

आधुनिक केसरी

**श्रीमहाराज येहळेगावी आले**
**तुकामाई"हे आपले सद्गुरू**
**विचार अंतर्मनात प्रकाशले**
**श्रीगुरूंच्या भेटी मन आतुरले ।।**
**गुरुमाऊली तुकामाईबद्दल**
**घेऊया जाणुनी आपण जन हो**
**दुर्मिळ ,दुर्लभ योग असतो हा**
**लाभणे श्रीगुरूंचा सहवास हो ।।**
**येहळेगाव आडवाटेचं गाव**
**इथले काशिनाथपंत, पार्वती**
**तुकामाईच्या माता-पित्याचे नाव**
**ओळखे यांना सारा येहळेगाव ।।**
**श्रीदत्त अवधूत आराध्य दैवत**
**पार्वतीबाईचे जप, ध्यान, उपास**
**काशिनाथपंत साधनेत मग्न असे**
**दिनक्रम श्रीगुरुसेवेत जात असे ।।**
**दत्तअवधुतांची कृपा हो झाली**
**पार्वतीबाईंना पुत्र- प्राप्ती झाली**
**पंतांची गुरूसेवा सफल झाली**
**अरुणदासाची- लेखणी धन्य झाली ।।**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, ९ मार्च २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# 'अवकाळी'च्या मदतीसाठी आमदार आक्रमक

## विधानभवनाच्या पायऱ्यांवर उतरत जोरदार घोषणाबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे झालेच पाहिजेत...अवकाळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळालीच पाहिजे... जाहीर करा, जाहीर करा शेतकऱ्यांना भरपाई जाहीर करा... कोण म्हणतंय देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही...बळीराजाला मदत मिळालीच पाहिजे... मंत्री तुपाशी शेतकरी उपाशी... नुकसान भरपाई जाहीर करा, नाहीतर खुर्च्या खाली करा... अशा घोषणांनी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाचा परिसर दणाणून सोडला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजाचा सहावा दिवस असून अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी महाविकास आघाडी आमदारांनी विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत सरकारविरोधात जोरदार निदर्शने केली.

अवकाळी पाऊस, गारपीटीने राज्यातील शेतकरी अडचणीत असताना मुख्यमंत्री धुळवड खेळण्यात दंग होते असा थेट आरोप विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी करत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला . नाफेडकडून अजूनही शेतमाल खरेदी सुरु नाही, सरकारकडून सभागृहाची दिशाभूल करण्यात आली आहे . शेतकऱ्यांच्या प्रश्नी सरकारच्या संवेदना बोथट झाल्या आहेत असा आरोप करत शेतकऱ्यांच्या प्रश्नी सरकारचा निषेध करत विरोधी पक्षाने सभागृहातून सभात्याग केला .



## विधानसभेत चिमटे आणि टोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** हिंदू देवस्थानांच्या जमिनी हडप करण्याचा प्रकार आपण कोणीही खपवून घेऊ शकत नाही. या प्रकरणात तक्रारदाराचे संरक्षण केले पाहिजे होते मात्र उलट सरकार बदलल्यानंतर तक्रारदाराचे संरक्षण काढण्यात आले, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले. ही बाब अयोग्य आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीसांना सभागृहात घेरले आणि हा महत्वाचा मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला. बीड जिल्ह्यातील आष्टी येथे अनेक हिंदू देवस्थानांच्या ट्रस्टच्या जमीनी हडप करण्याचा प्रकार घडला असल्याचे आज प्रश्नोत्तराच्या तासात जयंत पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. हिंदू देवस्थान जमीनीच्या या प्रकरणाचा तपास एसीबी करत आहे मात्र एसीबीकडून चालढकल होत आहे. गुन्हेगाराला अटक करण्यात आली नाही. हिंदू देवस्थानच्या जमिनी हडप करणे हा चिंतेचा विषय आहे. त्यामुळे जमिनी हडप करणारे कोणीही असो, कोणत्याही पक्षाचे असो त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी. लवकरात लवकर देवस्थानांना जमिनी परत करण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणीही जयंत पाटील यांनी केले. देवेंद्र फडणवीस यांच्या मनात आले तर ते किती शीघ्रगतीने काम करू शकतात हे याच प्रकरणातून दिसते.

## श्रामिनी चौधरी नांदूरपठारच्या सरपंचपदी बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** नांदूरपठारच्या सरपंचपदी सौ. श्रामिनी संदीप चौधरी यांची बुधवारी बिनविरोध निवड झाली. चौधरी या आ. नीलेश लंके यांचे स्विय सहाय्यक संदीप चौधरी यांच्या सुविद्य पत्नी आहेत. दोन वर्षांपूर्वी झालेल्या नांदूरपठार ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित पॅनलने सर्व ९ जागा जिंकत ग्रामपंचायतीवर वर्चस्व प्रस्थापित केले होते. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या सरपंचपदावर दोन वर्षापूर्वी चित्रा दिनेश घोलप यांची तर उपसरपंचपदी सुरेश लक्ष्मण आग्रे यांची एकमताने निवड करण्यात आली होती.

दोन वर्षांचा कार्यकाळ संपल्याने सरपंच चित्रा घोलप तसेच उपसरपंच सुरेश आग्रे यांनी आपापल्या पदाचे राजीनामे दिले होते. रिक्त सरपंचपदाच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडलाधिकारी पंकज जगदाळे यांनी बुधवारी ग्रामपंचायत सदस्यांची विशेष सभा बोलविली होती. या सभेमध्ये सरपंचपदासाठी श्रामिनी संदीप चौधरी यांनी अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्जावर कोमल शशिकांत आग्रे यांनी सुचक म्हणून तर गोरख भागा पानसरे यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत श्रामिनी चौधरी यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याने सरपंच म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी पंकज जगदाळे यांनी जाहिर केले. जगदाळे यांना तलाठी येवले व ग्रामसेवक सांगळे यांनी सहाय्य केले. यावेळी माजी सरपंच रविंद्र राजदेव, माजी उपसरपंच सुरेश आग्रे, सेवा संस्थेचे चेअरमन मदन देशमाने, माजी चेअरमन नारायण राजदेव, माजी सरपंच भानुदास आग्रे, तंटामुक्तीचे अध्यक्ष दत्ता चौधरी, नारायण आग्रे, नवनाथ घोलप, जयराम



चौधरी, शशिकांत आग्रे, ग्रामपंचायत सदस्य शिवप्रसाद दिवेकर, कोमल आग्रे, सोनाली आग्रे, बाळासाहेब लंके, गणपत पाटील घोलप, गोरख पानसरे, सुनील राजदेव, रामदास वलवे, गोपाळा आग्रे, देमन पाटील घोलप, राजधर राजदेव, हरिभाऊ राजदेव, बाळासाहेब शिरतर, मंगेश आहीले, दत्ता देशमाने, भास्कर चौधरी, कचर आग्रे, बाबाजी पानसरे, माधव आग्रे, रामदास राजदेव, अर्जुन चौधरी, संजय देशमाने आदी उपस्थित होते.





## दर्शन घेताना भाविकांनीच द्राक्षे तोडली

### आमलकी एकादशीनिमित्त केली होती द्राक्षांची आरास

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीनाथाच्या मंदिरात आमलकी की एकादशी निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात द्राक्षांची आरास करण्यात आली होती ही द्राक्ष दर्शन रांगेतील भाविकांनी खाल्ल्याचे व मंदिर समितीच्या कर्मचाऱ्याकडून भाविकांना प्रसाद म्हणून वाटप करण्याचे सीसीटीव्हीचे फुटेज मंदिर समितीच्या वतीने प्रसारित करण्यात आले असून या सजावटीसाठी पुणे व बारामती येथील दोन भाविकांनी एक टन द्राक्ष दिली होती.

सजावट केल्यानंतर दोन तासातच एक टन द्राक्ष गायब झाली होती या एक टन द्राक्षाचे दोन तासात काय झाले असा सवाल उपस्थित करून द्राक्ष केली कुठे याची चौकशी करावी अशी मागणी होऊ लागली होती खात्रीसाठी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावेत अशी मागणीही करण्यात आली होती यावेळी मंदिर समितीच्या वतीने विठ्ठलाच्या गाभाऱ्यातील व मंदिरा परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्रसारित करण्यात आले यामध्ये स्पष्टपणे दिसून येते की सजावट करण्यात आलेली द्राक्षे दर्शन रांगेतील उभे असलेल्या भाविकांनी व दर्शन करून बाहेर पडणाऱ्या भाविकांनीच तोडल्याचे दिसत आहे. भाविक हातात द्राक्ष तोडून प्रसाद म्हणून खात असल्याचे सीसीटीव्ही मध्ये दिसून येते आहे. तसेच सजावट केलेल्या ठिकाणाची द्राक्ष भाविकांनी तोडल्यानंतर द्राक्ष व पाने खाली पडत असल्याचे दिसत आहे. यानंतर मंदिर समितीमधील सफाई कर्मचाऱ्यांनी साफसफाई करून ही द्राक्ष गाभाऱ्याच्या बाहेर आणून दर्शन रांगेतील भाविकांना प्रसाद म्हणून वाटप करण्याचे फुटेज सीसीटीव्हीमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. सजावट करण्यात आलेल्या एक टन द्राक्षाचा वापर भाविकांसाठीच करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

## वादळी पावसामुळे शाळेच्या वर्गखोल्या पडल्या

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** तालुक्यात व परिसरातील भांगात काही ठिकाणी वादळी वारे तर हलक्या स्वरूपात पाऊस पडला आहे . त्यात तालुक्यातील दैठणा बुद्रुक येथील काल अचानक संध्याकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह पाऊसामुळे गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्यांच्या दोन्ही साईडच्या भिंती ह्या पडल्या असल्याने वर्गखोल्यांचे नुकसान झाले आहे. या वर्गखोल्या अगोदरच जीर्ण अवसथेत होत्या अनेकवेळा गावकऱ्यांनी शिक्षण विभागाकडे तक्रारीही केलेल्या असून शिक्षण विभागाने गावकऱ्यांच्या तक्रारीची दखल न घेता तसेच तक्रारींचा ढिग मारला मात्र काल झालेल्या संध्याकाळच्या जोराच्या वाऱ्यासह पावसामुळे गावातील शाळेच्या जीर्ण झालेल्या वर्गखोल्यांच्या भिंती पडल्या यामुळे गावातील काही सामाजीक नागरिकांनी परतूर येथील उपविभागीय अधिकारी यांना माहिती देऊन घटनास्थळाची पाहणी करूण पंचनामा करण्याची मागणी केली आहे.



# बीएसएनएलची भरारी

आधुनिक केसरी

बीएसएनएल ही भारतातील सरकारी टेलिकॉम कंपनी आहे. ही कंपनी आपल्या ग्राहकांसाठी नवनवीन रिचार्ज प्लॅन्स लॉन्च करत असते. बीएसएनएल ग्राहकांसाठी आनंदाची बातमी आहे. मात्र आता बीएसएनएल कंपनी आपल्या ग्राहकांसाठी एक नवीन सर्व्हिस लॉन्च करणार आहे. भारत संचार निगम लिमिटेड लवकरच भारतात 4G सर्व्हिस लॉन्च करणार आहे. बीएसएनएलने पुढील महिन्यात म्हणजेच एप्रिल महिन्यामध्ये कमर्शिअल ४ जी सेवा सुरु करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यासाठी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडून काही उपकरणे खरेदी करत आहे. मागील महिन्यामध्ये कंपनीने TCS कन्सोर्टियमकडून उपकरणांसाठी तब्बल २४,५०० कोटींचा कर्रारला मंजुरी दिली आहे. माध्यमांच्या माहितीनुसार BSNL कंपनी २०० साईट्ससाठी उपकरणे प्री-ऑर्डर करत आहे. ज्याचा सध्या सुरुवातीला वापर हा पंजाब राज्यामध्ये केला जाणार आहे. सुरुवातीला पंजाबच्या फिरोजपूर, अमृतसर आणि पठाणकोट या तीन जिल्ह्यांमध्ये ४ जी सेवा लॉन्च केली जाणार आहे. ४ जी सेवा लॉन्च करण्यासाठी BSNL च्या पायलट प्रोजेक्टचा हा एक भाग आहे. अजून टीसीएसच्या अंतिम निविदेला सरकारची मंजुरी मिळणे बाकी आहे. टीसीएसला १ लाख ४ साईट्ससाठी मार्च महिन्याच्या शेवट्पर्यंत सरकारची मान्यता मिळू शकते. कंपनी पंजाबमधून या सेवांसाठी टेस्टिंग सुरू करणार आहे. TCS च्या मालकीच्या Tejas Networks ने आधीच सुमारे ५० साईटसाठी उपकरणे पुरविली आहेत. ज्यासाठी C-DOT (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलिमॅटिक्स) सॉफ्टवेअर पॅच अपग्रेड तैनात केले जाऊ शकते. सरकारी अधिकाऱ्यांच्या मतानुसार, मार्चच्या मध्यापर्यंत ४जी लॉन्च होण्यासाठी सुमारे १०० साईट्स तयार असण्याची अपेक्षा आहे. जर का सर्व गोष्टी प्लॅननुसार झाल्या तर, BSNL आपली ४ जी सेवा एप्रिल महिन्यात लॉन्च करू शकते. बीएसएनलने भारतात ४ जी सर्व्हिस लॉन्च केल्यानंतर त्याच्या फायद्यामध्ये २० टक्क्यांनी वाढ होण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय राज्यमंत्री देवुसिंह चौहान म्हणाले की, याच्या अंमलबजावणीमुळे bsnl ला २०२६-२०२७ या आर्थिक वर्षापासून फायदा होण्यास सुरुवात होईल.

# प्रदूषित नद्यांची चिंता कुणाला ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीत अनादी काळापासून नद्यांना विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की सकाळी पवित्र नद्यांचे स्मरण केल्यास जीवनात यश मिळते. नद्यांनी संस्कृतीच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. भारतीय संस्कृतीत नद्यांना देवी समतुल्य मानले जाते. गंगेसह अनेक नद्यांचा उगम देवतांशी जोडला गेला आहे. दैवी शक्तींच्या अस्तित्वाचा संबंध नद्यांच्या प्रवाहाशी जोडण्यामागे कदाचित नद्यांचे महत्त्व आपण स्वीकारले पाहिजे हा हेतू असावा. मानवी संस्कृतीचा विकासही नद्यांच्या काठीच झाला. काळाच्या ओघात पाण्याच्या सहज उपलब्धतेमुळे नद्यांच्या काठावरील वसाहतींची रचना दाट होत गेली. हळूहळू या वसाहतींनी मोठ्या शहरांचे रूप धारण केले.**

पृथ्वीवरील सर्व जलस्रोतांपैकी सत्त्याण्णव टक्के पेक्षा जास्त पाणी खारे आहे आणि बाकीचे बहुतेक हिमनगांच्या रूपात गोठलेले आहेत. या गोठलेल्या जलस्रोतांमधून बहुतांश प्रमुख नद्या उगम पावल्या आहेत. पृथ्वीवरील लोकसंख्येचा मोठा भाग पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी नद्यांवर अवलंबून आहे. यामुळेच प्राचीन काळी नद्यांच्या प्रवाहाची शुद्धता राखण्याकडे विशेष लक्ष दिले जात असे. असं म्हटलं जातं की, ज्योतिषशास्त्राच्या सामान्य समजुतीनुसार नद्यांच्या पाण्यात घाण टाकणाऱ्याला मातृ ऋणाचा शाप मिळतो. लोकांनी नद्यांच्या पाण्यात घाण टाकू नये, ही या श्रद्धेमागची मानसशास्त्रीय वस्तुस्थिती आहे. पण आपण पारंपारिक समज नाकारल्या आणि त्याचा परिणाम असा झाला की ज्या नद्या एकेकाळी पवित्र मानल्या जात होत्या त्या नद्यांमध्ये डुबकी मारल्याने सगळे पाप धुतले जातात अशी अंधश्रद्धा पसरवली. आणि आज याच नद्या इतक्या प्रदूषित झाल्या की यातले पाणी पिण्यायोग्यही राहिले नाही. तार्किक असण्याच्या आग्रहात परंपरा समजून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आम्ही आंधळेपणाने त्यांचे अनुसरण करू लागलो. प्राचीन काळी नद्यांवरच्या पुलावरून जाणारे प्रवासी नद्यांबद्दलची श्रद्धा व्यक्त करण्यासाठी नदीच्या पाण्यात काही नाणी टाकत असत. हा तो काळ होता जेव्हा नाणी तांबे किंवा चांदीची होती. तांबे आणि चांदीमध्ये पाणी शुद्ध करण्याचे नैसर्गिक गुणधर्म आहेत. म्हणजेच प्रतीकात्मक दृष्ट्या मानव नदीच्या पाण्याची शुद्धता राखण्याच्या विधीमध्ये अंशतः हातभार लावत असे. पण नंतर याच पाण्यात शिसे किंवा इतर धातूंची नाणी टाकली जाऊ लागली. नद्या आपली पापे धुवून टाकतात ही श्रद्धाही त्यांच्या प्रदूषणाचे कारण बनली. कोरोनाच्या काळात हजारो अर्धे जळालेले किंवा न जळलेले मृतदेह नद्यांमध्ये फेकण्यात आले. यातून नदीचे पाणी किती प्रदूषित झाले असेल याची कल्पना करा. गेल्या काही दशकांमध्ये नद्यांमधील प्रदूषण झपाट्याने वाढले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील 603 नद्यांच्या प्रदूषणाच्या पाहणीचा अहवाल अलिकडेच प्रसिद्ध केला आहे. नदी प्रदूषणाच्या पाहणीत महाराष्ट्र पहिल्या तर मध्यप्रदेश दुसऱ्या क्रमांकावर आहे. या राज्यात 19 पट्टे आढळले आहेत. बिहार 18 पट्ट्यांसह तिसऱ्या स्थानी आहे. केरळमध्ये 18, कर्नाटकात 17, उत्तरप्रदेशात 17, राजस्थानात 14 तर गुजरामध्ये 13 दुषीत पट्टे आढळले आहेत. खरे तर ही गंभीर चिंतेची बाब आहे कारण त्याचा थेट परिणाम मानवांवर होत आहे. जर नद्या प्रदूषित झाल्या आणि त्या टिकल्या नाहीत तर आपण पृथ्वीवर कसे जगू? आज ज्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे आणि बहुतांश नद्या प्रदूषणाचा सामना करत आपले दिवस मोजत आहेत, हा एक मोठा इशारा आहे. काही काळापूर्वी सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटने केलेल्या सर्वेक्षणात असे



दिसून आले आहे की भारतातील बहुतेक नद्यांच्या पाण्यामध्ये शिसे, कॅडमियम, आर्सेनिक, निकेल, क्रोमियम, लोह आणि तांबे यांचे प्रमाण धोकादायक पातळीपेक्षा जास्त आहे.सर्वेक्षणात एकशे सतरा नद्या आणि उपनद्यांमध्ये पसरलेल्या निरीक्षण केंद्रांच्या एक चतुर्थांश नमुन्यांमध्ये दोन किंवा अधिक विषारी धातूंचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. या प्रदूषणासाठी खाणकाम, भंगार उद्योग आणि विविध धातुकर्म उद्योगांद्वारे पर्यावरणात सोडले जाणारे विषारी धातू कारणीभूत आहेतच, परंतु आपली आधुनिक जीवनशैलीही याला जबाबदार आहे.

गंगेसारखी नदी, तिच्या एकूण प्रवाहाच्या सुमारे अडीच हजार किलोमीटर क्षेत्रफळाच्या सुरुवातीलाच प्रदूषित होऊ लागते. उत्तराखंडच्या साडेचारशे किलोमीटरच्या प्रवाहात डझनहून अधिक नाल्यांतून पंचेचाळीस कोटी घन लिटरहून अधिक घाण पाणी गंगेत सोडले जाते. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्येही हेच वर्तन या पवित्र नदीला सहन करावे लागत आहे. गंगा ही जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित नद्यांपैकी एक असल्याचे आढळून आले आहे. आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे की गंगा नदी ही जगातील सर्वात जास्त कचरा समुद्रात वाहून नेणाऱ्या नद्यांपैकी एक आहे. कल्पना करा, जी नदी जीवनदायी आहे असे म्हटले जाते, त्या नदीच्या बाजूने समुद्रात जाणाऱ्या कचऱ्याचा पर्यावरणावर आणि जलचर प्राण्यांच्या आरोग्यावर काय परिणाम होत असेल? गंगासारख्या नदीची ही अवस्था असेल तर इतर नद्यांच्या दुर्दशेची काय अवस्था असेल. यमुनेत उठणारा पांढरा फेस तिच्या प्रदूषणाची कहाणी सांगतो. एकेकाळी झारखंडची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या दामोदर नदीचे पाणी इतके प्रदूषित झाले आहे की, खुद्द पर्यावरण विभागाच्या म्हणण्यानुसार अनेक ठिकाणी तिचे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. सुवर्णरेखा नदीला एकेकाळी झारखंडची गंगा म्हटले जायचे, पण आता ती आंघोळीसाठीही लायक राहिलेली नाही. मध्य प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार अमरकंटकमध्ये नर्मदा सर्वाधिक प्रदूषित आहे. अमरकंटक, ओंकारेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या नर्मदेच्या पाण्यात क्लोराईड आणि विद्राव्य कार्बन डायऑक्साइडची पातळी चिंताजनक बनली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील 603 नद्यांच्या प्रदूषणाच्या पाहाणीचा अहवाल अलिकडेच प्रसिद्ध केला आहे.महाराष्ट्रातील नद्यांच्या अहवालात अतिप्रदुषित गटात चार पट्टे आढळून आले. त्यात कृष्णा नदीचाही समावेश आहे. भीमा, गिरणा, गोदावरी, गोमती, हिरवा, इंद्रायणी, काळू, कोयना या नद्याही अनेक पट्ट्यात प्रदुषित झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सर्वाधिक 55 पट्टे महाराष्ट्रातील आहेत. उत्तर प्रदेशातील पूर्वांचलला हिरवेगार ठेवणाऱ्या डझनहून अधिक नद्या मृतावस्थेत आहेत. गोमती, पीलीनदी, मागाई, गदई, तामसा, विशाही, चंद्रप्रभा, सोन नदी आदींची अवस्था बिकट आहे. किंबहुना, पवित्र नद्यांच्या काठावरील काही समारंभ आणि विधी पाण्याच्या प्रदूषणासाठी काही कमी जबाबदार नाहीत, कारण आपण पूजा साहित्य किंवा पूजेत वापरल्या जाणाऱ्या मूर्ती पाण्यात विसर्जित करता येतील या विचाराने नदीत टाकतो. पाण्यात वस्तू टाकून प्रवाहित केल्याने पाप लागणार नाही, असे मानतो. मात्र असे करत असताना आपण हे विसरतो की हे पदार्थ तयार करताना वापरलेली रसायने किंवा काही घटक पाण्याला गुदमरून टाकण्याचे काम करतात. विषारी धातूंबरोबरच नद्यांच्या पाण्यात रासायनिक औषधांमुळेही प्रदूषणात अत्यंत वाईट प्रकारे वाढ होत आहे. जगातील सर्व खंडांतील एकशे चार देशांतील दोनशे अठ्ठावीस नद्यांवर केलेल्या संशोधनात ही बाब समोर आली आहे. या संशोधनात जगातील शंभरहून अधिक शास्त्रज्ञांचा सहभाग होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, नद्यांच्या पाण्यात अपस्मारविरोधी औषध कार्बामाझेपिन, मधुमेहावरील औषध मेटफॉर्मिन आणि कॅफिनसह विविध औषधांचे घटक धोकादायक प्रमाणात आढळून आले. हे घटक मानवी कचरा, प्रक्रिया न केलेला मलनिस्सारण, नदीकाठचा कचरा किंवा औषध कंपन्यांकडून प्रक्रिया न केलेला कचरा नद्यांमध्ये प्रवेश करतात. एकोणीस टक्के ठिकाणी, संशोधकांना धोकादायक पातळीवर नदीच्या पाण्यात जैव-प्रतिरोधक आढळून आले आहे. ही पर्यावरणासाठी एक नवीन जागतिक समस्या म्हणूनही उदयास येत आहे. भारतातील नद्यांच्या नमुन्यांमध्ये कॅफिन, निकोटीन, वेदनाशामक, अँटीबायोटिक्स, अँटी डिप्रेसंट्स, अँटी-डायबेटिक, अँटी-ॲलर्जिक औषधे आढळून आली आहेत. नद्यांमधील औषधांमुळे वाढणारे प्रदूषणही संवेदनशील लोकांना घाबरवू लागले आहे, कारण या प्रदूषणाचा अप्रत्यक्षपणे करोडो लोकांच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो.

# पंजाब पुन्हा पेटतोय! सरकारने गुडघे टेकले ?

तो दुबईत तो वहातुकीचे काम करत होतो. तो पंजाबमध्ये परत आलेला आहे.तो पंजाब स्वतंत्र खलिस्तानची मागणीवरून शीख युवकांना संघटीत करण्याचे व त्यांची दिशाभूल व व भडकविण्याचे काम करत आहे.या अमृतपालसिंघ याचा साथीदार लव्हप्रीतसिंघ तूफान यास पंजाब पोलिसांनी रुपनगर येथील चमकौरसाहिब गुरूद्वाराऱ्याचे वारिंदरसिंग यांचे अपहरण व छळ केल्याच्या गंभीर आरोपावरुन अटक केली होती.यात अमृतपालसिंग याचे नाव होते.अमृतपाल याने आपल्या साथीदाराची मुक्तक्ता करणे व गुन्हा रद्द करण्याचा मागणी केली व पोलिस स्टेशनवर मोर्चा काढणार असल्याचा इशारा दिला होता.यातून अमृतपाल सिंह याने अमृतसर जिल्ह्यातील अजनाला शहरातील पोलिस स्टेशनवर हल्ला दि.२३ फेब्रुवारी २०२३ रोजी केला.यावेळी तेथे मोठ्या प्रमाणात पोलिस तैनात करण्यात आले होते.पोलिस स्टेशनवर हल्ला करणाऱ्यांच्या हातात शस्त्रे होती. या संतप्त हल्लेखोररांनी पोलिसांचे बॅरिकट तोडले व ते पोलिस स्टेशनमध्ये घुसले.त्यांनी पोलिसावर मारहाण केली,यातअधिकारी, कर्मचारी जखमी झाले.हल्लेखोरांनी पोलिस स्टेशनला घेराव घातला. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी व अमृतपालसिंघ यांचेत वाटाघाटी करण्यात आल्या.या बाबतची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान यांना माहिती दिली असाणाच. त्यानंतरच पंजाब वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने अटक केलेल्या आरोपी विरोधात पुरावे उपलब्ध नसल्याचे कारण देत त्या आरोपींची सुटका करण्याचे जाहीर केले. अमृतपालसिंघ यांच्या बेकायदेशीर मागणीसमोर पंजाब सरकार व पोलिस यंत्रणेवर शरणांगती पत्करली. ही घटना पंजाब राज्य सरकारची व पोलिस यंत्रणेची नामुश्की करणारी ठरली आहे.ही घटना क्षुल्लक वाटत असावी,पण यातून दहशदवाद्यांचा आगडोंब उसळू शकतो, याची भीती वाटते. खलिस्तान चळवळीच्या कारवाया राजकीय पक्षाच्या पाठिंब्या शिवाय होऊ शकत नाहीत. केजरीवाल हे खलिस्तान चळवळीचा विरोधात भूमिका घेत नाहीत.मागील व ताज्या घटना पाहता आम आदमी नेते आणि खलिस्तान समर्थकांचे तार जुळताना दिसताय!. केजरीवाल हे भ्रष्टाचारी व दहशतवादी प्रवृत्तीच्या विरोधात 'झाडू' फिरविण्याचा निर्णय का घेत नाहीत ?माणूस स्वतः चे घर साफ प्रथम झाडू घेतो.तेंव्हा प्रथम आम आदमी पक्षातील घाण दूर करण्याचे काम करावे लागेल. पंजाबमध्ये



८ऑगस्ट २०२१ टँकरला उडविण्यासाठी टिफीन बाँम्बचा वापर,याचदिवशी डेलके गावात टिफीन बाँम्ब सापडले.२१ ऑगस्ट २०२१ - कपूरथला पोलिसांना फमवाडा येथे टिफीन बाँम्ब अन्य स्फोटके सापडली.१५ सप्टेंबर २०२१- पाक सीमेजवळील ३ किं.मी अंतरावर असलेल्या जलाहाबाद बाद मोटारसायकलव्दारा स्फोट.७ नोव्हेबर २०२१- नवाशहरातील गुन्हा शाखा तपास यंत्रणेच्या हँड ग्रेनेडने हल्ला. २२ नोव्हेंबर २०२१ ला पठानकोट भारतीय लष्कराच्या कँपवर हँड ग्रेनेड फेकले.२३ डिसेंबर २०२१ -लुधियाना न्यायालयाच्या स्फोट.३० एप्रिल २०२२- खलिस्तानी व शिवसेना कार्यकर्ते भिडले,अनेक जखमी.५ मे २०२२-करनालामध्ये मोठ्या प्रमाणात स्फोटके सापडली.८ मे२०२२- तरनतारन जिल्ह्यात नौशेरा येथे आय,डी. व आर डी.एक्स सापडले.याच दिवशी हरियाना येथे विधानसभा प्रवेशव्दारावर खलिस्तानचे झेंडे व पोस्टर्स लावले गेले.९ मे २०२२- मोहाली येथील गुप्तचर विभागाच्या इमारतीवर ग्रेनेडने हल्ला करण्यात आला,या घटनाची यादी मोठी आहे, यात पाकच्या आय.एस.आय. हात असल्याचे पुरावे सापडले आहेत. पाकिस्तानातून पंजाब सीमेवर ड्रोनव्दारे ड्रग्स,शस्त्रे व स्फोटके पाठविली जात आहेत.ती कोणा करिता ? त्या राष्ट्रविरोधी शक्ती कोण आहेत ?पाकचा पंजाब खलिस्तान चळवळ सक्रिय करण्यामागे व आयएसआय. चा लष्करे खालसाची स्थापना करण्यामागे हात आहे.तेंव्हा पंजाबमध्ये पुन्हा 'दहशदवादी कँन्सर' पसरत चालला आहे. पंजाबमध्ये कायदा सुव्यवस्था राज्य सरकारच्या हाताबाहेर गेली आहे,त्यामुळे मुख्यमंत्री मान व यांनी गृहमंत्री अमित शहा यांना भेटले.मान गृहमत्री शहा यांना भेटण्यासाठी नेते केजरीवाल यांची परवानगी घेतली असणारच! केवळ सरकार वाचविण्यासाठी आम आदमीचे नाटक आहे.पंजाबमधील दहशदवादी कँन्सर प्राथमिक अवस्थेत आहे,तेंव्हा ऑप्रेरेशन' लगेच करण्याची गरज आहे.केंद्रातील भाजपा सरकारने पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार आहे म्हणून जर सावध भूमिका घेत असेल तर ती राष्ट्राच्या सुरक्षतेच्यादृष्टीने घातकी ठरेल.तेंव्हा हा 'दहशदवादी कँन्सर' आताच नष्ट केलाच पाहिजे,अन्यथा भारताला गंभीर परिणाम भोगावे लागतील! असे वाटते.

**कमलाकर जोशी, ज्येष्ठ पत्रकार नांदेड**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# आ. बच्चू कडू यांना दोन वर्षांची शिक्षा

## सरकारी कामात अडथळा आणणे चांगलेच महागात पडले

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी आ. बच्चू कडू यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने याबाबत महत्वपूर्ण निकाल दिला आहे. पंधरा हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर आ. बच्चू कडू यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

अपक्ष आ.बच्चू कडू यांना सरकारी कामात अडथळा आणणे चांगलेच महागात पडले आहे. नाशिक महापालिका आयुक्तांवर आ. बच्चू कडू यांनी हात उगारला होता. हे प्रकरण कोर्टात पोहोचले होते. या प्रकरणात बच्चू कडू यांना कोर्टाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. दिव्यांगांच्या मागण्यांसाठी 2017 साली आमदार बच्चू कडू यांनी महापालिकेत आंदोलन केले होते. आंदोलना दरम्यान बच्चू कडू यांनी तत्कालीन महापालिका आयुक्तांवर हात उगारला होता. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी 2 वर्षांची शिक्षा नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने सुनावली आहे.

प्रहारच्या माध्यमातून नाशिक महापालिकेने दिव्यांग कल्याण निधी खर्च केला नाही, याबाबत आंदोलन सुरु होते. यावेळी प्रहारच्या शिष्टमंडळाकडून तत्कालीन आयुक्तांची भेट घेण्यात आली होती. यावेळी आमदार बच्चू कडू आणि तत्कालीन



महापालिका आयुक्त अभिषेक कृष्णा यांच्यात चकमक झाली होती. सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे याप्रकरणी गुन्हा नोंदविला होता. दरम्यान याप्रकरणी सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी एक तर सरकारी अधिकाऱ्याला अपमानित केल्याप्रकरणी एक अशी 2 वर्षांची शिक्षा नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने सुनावली आहे.

तसेच अपंग पुनर्वसन कायद्याची अंमलबजावणी झाली नसल्याकारणाने तत्कालीन आयुक्त अभिषेक कृष्ण यांना घेराव घालण्यात आला होता. त्याचवेळी बाचाबाची झाल्याने बच्चू कडू यांनी आयुक्तांवरच थेट हात उगारला होता. नाशिक महापालिकेने 1995 चा अपंग पुनर्वसन कायदा अद्याप अंमलात आणला नाही. तसेच अपंगांचा राखीव तीन टक्के निधी खर्च केला जात नसल्यामुळे मनपा मुख्यालयासमोर प्रहार संघटनेच्या वतीनं धरणे आंदोलन करण्यात आले होत.

# वडोद बाजार येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. येथील जि.प. प्राथमिक शाळेत आरोग्य तपासणी शिबिरचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राची वैद्यकीय अधिकारी कर्मचारी, सरस्वती भवन प्रशालेतील शिक्षक विद्यार्थी जि.प. शाळेतील विद्यार्थी व शिक्षक तर महिला उपस्थित होत्या. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी जि.प. महिला व बालकल्याण सभापती अनुराधाताई



चव्हाण या उपस्थित होत्या. सरपंच पाकीजा पठाण, उपसरपंच गोपाळ वाघ, ग्रामसेवक रामदास पाथरे, जि. प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गाडेकर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. काथार मॅडम, बावस्कर व ग्रा.पं. सदस्य शिला शिनगारे, स्वाती वायकोस, कविता दुधे, माजी जि.प. सदस्य इंदुबाई वाघ, ग्रा.पं. सदस्य काकाजी कोलते, शुभम गंगावणे, राजिक शेख, अशोक शिंगारे, साबिर पठाण, चेअरमन कडूबा मस्के, गोविंद पांडे ,मनीषा कोलते, यमुनाबाई काटकर उपस्थित होत्या.

# १९८८मध्ये रेल्वे स्टेशन, बस स्थानक येथे औरंगाबाद नावास काळे फासणाऱ्या महिलांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनानिमित्त गुलमंडी येथे शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे ) महिला आघाडीच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी संभाजीनगर असे नामकरण केल्यानंतर वैजयंती खैरे यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे स्टेशन, बस स्थानक येथे संभाजीनगर असे नामकरण करून औरंगाबाद नावाला काळे फासले होते. यावेळी आंदोलनात सहभागी असणाऱ्या ११ महिलांचा गौरव करण्यात आला.

आंदोलनाला वैजयंती खैरे, संपर्कसंघटक सुनीता आउलवार, सहसंपर्क संघटक सुनीता देव, उपजिल्हासंघटक सुनंदा खरात, मालती भोसले, चंद्रकला मोहिते, चंद्रकला चव्हाण, अनुसया शिंदे, माधुरी जोशी, हेमलता पाटील, माया कुलकर्णी, हेमलता पाटील, भारती माहरे



आदी महिला सहभागी होते. या सर्व महिलांचा आज सत्कार करण्यात आला. यावेळी उपजिल्हा संघटक अंजली मांडवकर, दुर्गा भाटी, जयश्री लुंगारे, लक्ष्मी नरहिरे, विजया त्रिभुवन, गणोरे आदी महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन शहर संघटक विद्या अग्निहोत्री यांनी तर आभार प्रदर्शन आशा दातर यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन विधानसभा संघटक मीरा देशपांडे यांनी केले.

## महाराष्ट्र Business Katta












# शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला... नाटक नव्हे ; लोकप्रबोधनाची वास्तवदर्शी चळवळ

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ८

गेल्या २४ फेब्रुवारी रोजी, औरंगाबाद येथील एन-२ विठ्ठलनगर मधील 'ज्ञानदीप शाळेसमोरील नेताजी सुभाषचंद्र बोस या मैदानावर झालेल्या 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकाच्या उदघाटनप्रसंगी खासदार चंद्रकांत खैरे साहेबांनी "औरंगाबाद शहराचे "छत्रपती संभाजीनगर" असे नामकरण झाल्याचे सांगितले..म्हणाले ही प्रक्रिया पहात होतो, ऐकत होतो म्हणून यायला उशीर झाला, ही बातमी आपल्या सर्वांसाठी आनंदाची आहे"... असे सांगत दीपप्रज्वल व हारतुऱ्याने उदघाटन सोहळा संपन्न झाला. लगेच नाटकाला सुरूवात झाली. नाटकाचा प्रयोग पाहण्यासाठी मी मुद्दाम मंठ्याहून गेलो होतो. हे नाटक पाहण्याचा योग येत नव्हता.. तो त्या दिवशी आला. नाटकाचा प्रयोग मैदानावर असूनही प्रचंड गर्दी होती. "शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला "ह्या नाटकाने खूप प्रसिद्धी मिळवली. झी गौरव पुरस्कार, म.टा. सन्मान पुरस्कार, मिफ्ता म्हैसकर पुरस्कार, भारत रंग थियटर महोत्सव NSD दिल्ली चा पुरस्कार, मराठी मुव्हीज वर्ल्ड गौरव पुरस्कार, असे बरेच पुरस्कार मिळवले."चला हवा येऊ द्या.! सारख्या नामांकित कार्यक्रमानेसुद्धा या नाटकाची दखल घेतली. भारतातील आघाडीचे नेते राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांनीसुद्धा या नाटकाचा ७०२ वा प्रयोग पुणे येथील टिळक स्मारकात कुटुंबासह बघितला. ग्रामीण कलावंतांच्या नाट्यप्रयोगाला प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे, प्रसिद्ध अभिनेते अमिर खान, अभिनेता भरत जाधव या दिग्गजांनी मुंबईमध्ये आवर्जून उपस्थित राहणं, हेच या नाटकाचं खरं यश म्हणावं लागेल !

लेखक राजकुमार तांगडे म्हणतात," या नाटकाचे दिग्दर्शक नंदू माधव असोत की, निर्माते भगवान मेदनकर यांच्यासारख्या अनेक दिग्गज मान्यवरांनी, सहकाऱ्यांनी आम्हां कलावंतांना वेळोवेळी सर्वच बाबतीत बळ दिलेलं आहे.

या नाटकाच्या शीर्षकानेच जनतेच्या मनात गोंधळ सुरू होतो. केवळ नाट्यरसिकांनाच नव्हे; तर सर्व धर्मातील, सर्व जाती समुहातील सामान्य माणसालाही ह्या नाटकाचे शीर्षकच कोड्यात टाकते, विचार करायला भाग पाडते आणि शेवटी या नाटकाचे शीर्षकच हे नाटक पाहण्यासाठी मजबूर करते..मीही यातून कसा सुटेल? मी तर कलेची दृष्टी जपणारा, कलेची दृष्टी घेऊन जगणारा ! चिंतन आणि चिकित्सा करणारा एक कलासक्त लेखक. हे नाटक बघितल्यावर नाटकाच्या संहितेचा विचार करतांना मला यातील काही बारकावे, संवादातील काही विशेष नोंदी... टिपण्याचा मोह आवरला नाही, त्या नाटकाच्या काही टिपण्या तुमच्यासाठी...

"शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला" ह्या नाटकाचे लेखक व शिवरायांची भूमिका करणारे राजकुमार तांगडे हे आमच्या परतूर आणि मंठा या संयुक्त मतदार संघातील सर्वस्पर्शी कलावंत. परतूरजवळ असलेले जांबसमर्थ हे त्यांचे गाव. या अगोदर त्यांचे आकडा ,चिवटी ही नाटके सुद्धा सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारीच आहेत. आपल्या परिसरातल्या एका लेखक, कलावंताने महाराष्ट्राला शिवरायांचा वास्तवदर्शी इतिहास सांगण्याचं धाडस केलं. छत्रपती शिवराय आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार महाराष्ट्रातील गावागावात पोहचविण्याचे काम लेखकमित्र राजकुमार तांगडे करत आहेत. याबाबत लेखनप्रपंचातून कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न. खरेतर विद्यमान परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्या दोन्ही महापुरुषांचे विषय अत्यंत संवेदनशील आहेत आणि हे दोन विषय नव्हे, तर दोन विचार एकत्र करून नाटकाद्वारे जनतेसमोर मांडावयाचे म्हणजे अत्यंत जिकिरीची बाब आहे..किंबहुना हे फार मोठे आव्हान आहे आणि हे आव्हान लेखक राजकुमार तांगडे यांनी स्वीकारलेलं आहे आणि ते पेललेलंही आहे.

या नाटकाचे २०१२ ते २०२३ या अकरा वर्षात सातशेच्या वर प्रयोग झाले असून या नाटकाच्या बाबतीत रसिकांचा जो उत्साह अगदी सुरुवातीला होता तोच उत्साह आजही कायम आहे.

"शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकाच्या शीर्षकाद्वारे लेखक राजकुमार तांगडे यांनी शिवरायांच्या कर्तृत्वाचा खरा विचार हा आंबेडकरी समुह, मुस्लिम समाज व बहुजन जनतेला वगळून करता येत नाही, असा संदेश दिला आहे. कारण शिवरायांच्या सैन्यात मुस्लिमांसह सर्व जातीधर्माचे लोक त्यांचे विश्वासू सैनिक होते. म्हणून शिवरायांचा विचार हा एकाच जातीतील, धर्मातील लोकांसाठी नसून तो समस्त मानव जातीच्या हिताचा होता आणि आहे म्हणून दांभिक राजकारणी व धर्मांध लोकांनी शिवरायांचा विचार संकुचित करून त्यांच्या विचारांना केवळ जातीचा आणि धर्माचा मुलामा दिलेला आहे. धर्मकारण असो की, राजकारण असो.. शिवरायांच्या नावाचा केवळ वापर करण्याचे काम अखंड सुरू आहे. म्हणून ह्या नाटकाच्या माध्यमातून शिवरायांचा खरा इतिहास जनतेसमोर यावा, शिवरायांची युद्धनीती, शत्रूला न कळणारा कावा, जनतेबद्दलची अस्मिता, शेतकऱ्यांबद्दलची भावना. स्त्रीबद्दलचा आदर, दीन दलितांचा कैवार घेऊन स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी सर्व जातीधर्माच्या मावळ्यांना सोबत घेणारा राजा. त्यांच्यावर कमालीचा विश्वास टाकून त्यांच्या कर्तबगारीचा गौरव करणारा राजा. त्यांना गुणवत्तेनुसार कामे वाटून देणारा राजा. अमावस्येच्या दिवशीच युद्धनीती ठरवणे म्हणजे अंधश्रद्धेला थारा न देणारा राजा, कुठलीही अंधश्रद्धा, जातीभेद न पाळणाऱ्या राजाला इतिहासकारांनी धर्मात बंदिस्त केले. आजच्या राजकर्त्यांनी जातीत बंदिस्त केले आहे. शिवरायांचा वास्तवदर्शी इतिहास समोर आणण्यासाठीच 'जांब समर्थ या छोट्याशा खेड्यातील 'रंगमळा' या नाट्य संस्थेच्या कलावंतानी हे पाऊल उचललेले आहे.

हे नाटक कितीतरी वेळा पहावे असे वाटते. हे नाटक वरचेवर भूत, भविष्य आणि वर्तमानातील घटनांना स्पर्श करत वळण घेत जाते, एखाद्या गंभीर विचारासोबत सहज विनोद साधून शिवरायांच्या चुकीच्या इतिहास लेखनावरही बोट ठेवले जाते. तो लेखकाचा हातखंडा आहे. शिवरायांचा खरा इतिहास जनतेसमोर यावा. या नाटकाचा हाच खरा उद्देश आहे, त्यानुसार लेखकाने पात्रांची निर्मिती केलेली आहे.

नाटकाच्या सुरुवातीला सर्व कलाकार रंगमंचावर पदार्पण करतात.. गोंधळाच्या अंगाने कथा सुरू होते. या गोंधळी कथेतून सर्वच कलाकार या गोंधळगीताची झील ओढतात. छत्रपती शिवाजी महाराजांना पृथ्वीवरून स्वर्गात घेऊन येण्याची इंद्रदेव यमाला आज्ञा करतात; परंतु शिवाजी महाराज यमाला सुद्धा चकवा देऊन गायब होतात. सतत चकवा देत राहतात. ( यमाची भूमिका प्रवीण डाळिंबकर यांनी विनोदात्मक रितीने खूप छान पार पाडली आहे. )

पुढे महाराजांची शेवटची मोहीम जालना येथे होती व महाराज अजूनही जालन्याकडेच असतील असा अंदाज गोंधळी व्यक्त करून सर्वजण जालन्याला येतात. तिथे धर्मा नावाचा शाहीर व त्याचे सहकारी वर्षानुवर्षे छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे सादर करून पोट भरत असतात. धर्मा शाहीर ( संभाजी तांगडे ) आपल्या पोवाड्यांमधून धर्माच्या अंगाने जाणारा अतिरंजित इतिहास सांगून शिवराय हे मुसलमानांच्या विरोधात होते, असे सांगत असतो. हिंदू- मुस्लिम, दलित, बहुजन समाजात दरी निर्माण करून ती दरी कायम रहावी म्हणून शिवरायांचा इतिहास धर्माच्या अंगाने पोवाड्यातून सांगत असतो. त्याचाच एक सहकारीमित्र सोंगाड्या मिलिंद कांबळे ( विनोद जैतमहाल ) मात्र नेहमी महापुरुषांची पुस्तके वाचणारा आणि इतिहासाकडे डोळसपणे पाहणारा, इतिहासाचा अभ्यासक असल्याने धर्मा शाहीर हा स्वतःच्या प्रत्येक पोवाड्यातून सांगत असलेला शिवरायांचा खोटा इतिहास मिलींदला आवडत नाही...याच कारणाने कालांतराने तो धर्मा शाहिराची साथ सोडून देतो. याच मिलिंद कांबळेच्या घरीच शिवाजी महाराज भूमिगत होऊन राहातात. (शिवाजी महाराज - राजकुमार तांगडे ) यमाला शिवाजी महाराज सापडत नाहीत म्हणून इंद्रदेव यमाला सस्पेंड करतात. ( यमाला सुद्धा सस्पेंड करण्याचा आधुनिक विचार लेखकाने नाटकात मांडला आहे. ) सस्पेंड होऊनही यमाची मात्र महाराजांच्या शोधात भटकंती सुरूच असते. सस्पेंड झालेला यम आता साध्या वेषात असतो. तो जिथे जाईल तिथे त्याच्या हातातला शिवाजी महाराजांचा जिरेटोप अनेकाच्या डोक्याला लावून माप घेत असतो; परंतु शिवाजी महाराज त्याला कुठेच घावत नाहीत...लेखकाच्या भाषेत' "डोक्याचं नाही, तर डोक्यातल्या मेंदूचं माप घ्यावं लागेल..ते तो कसे घेणार ?" शेवटी यम मिलिंदच्या घरी येतो. पुढे मिलिंद कांबळे आणि धर्मा शाहिराचे मतभेद टोकाला जातात. एका कार्यक्रमात त्यांची जबरदस्त जुगलबंदी होते..त्या जुगलबंदीतून धर्मा शाहीर धर्माच्या अंगाने इतिहास रंगवून सांगत असतो आणि मिलिंद कांबळे मात्र शिवरायांनी बहुजनांना सोबत घेऊन स्वराज्य कसे निर्माण केले. शिवरायांचे राज्याविषयीचे, राज्यातील जनतेच्या हिताविषयीचे धोरण व शिवरायांचे खरे कर्तृत्व सांगून धर्मा शाहिराचे मिलिंद तोंड बंद करतो... म्हणजे खऱ्या इतिहासाचा अभ्यास करणारा भीमनगरात राहतो, मोहल्ल्यात असतो आणि खोट्या इतिहासाचा बोलबाला करत स्वतःला शाहीर म्हणवून घेणारा समाजात दरी निर्माण करून पोट भरत असतो. या नाटकात धर्मा शाहीर आणि सोंगाड्या मिलींद कांबळे ( म्हणजे खोट्या इतिहासा-विरुद्ध खरा इतिहास ) असा आहे. या दोघातल्या जुगलबंदीचा संवाद प्रत्यक्षच पहावा आणि ऐकावा...

इथे या दोहोंच्या संवादातून शिवाजी महाराजांच्या खऱ्या कर्तृत्वाची ओळख होते आणि प्रेक्षकांचे डोळे उघडतात. लेखकाने नाटकातील पात्रांची नावेसुद्धा विचारपूर्वक ठेवलेली आहेत. जो शाहीर शिवाजी महाराजांचा इतिहास रंजक व धर्माच्या अंगाने सांगत आलेला आहे अशा शाहीराचे नाव 'धर्मा शाहीर' ठेवले आहे. खोटं,पण रेटून बोलणाऱ्या धर्मा शाहिराची भूमिका संभाजी तांगडे हे जीव ओतून करतात. शिवरायांचा खरा इतिहास सांगणारा सोंगाड्या मिलिंद कांबळे मात्र आंबेडकरी समाजाचा आहे. या नाटकात मिलिंद कांबळेच्या भूमिकेत विनोद जैतमहाल आहेत. मिलिंद कांबळेची पत्नी सावित्री ( श्रुती कुलकर्णी ) व मुलगी वैशाली ( रोशनी वाघमारे ) हे कुटुंब अत्यंत सुशील आणि सुशिक्षित आहे. या नाटकातील आक्का व दादा यांचे पात्र आश्विनी भालेकर व अशोक देवकर या दोघांनी वठवले आहे. या भूमिकेतून कार्यकर्त्यांचे म्होरके किती अडाणी, अविचारी असतात. ते अभ्यासू नसतात त्यांना फक्त शिवरायांच्या नावाने काहीतरी कार्यक्रम करायचा असतो. पैसे उकळायचे आणि उडवायचे असतात. पैसे देणाऱ्या पुढाऱ्यांच्या आदेशाने फक्त कार्यक्रम करायचा..एवढेच त्यांना माहित असते. हे सत्य नाटकाद्वारे निर्भयपणे दाखवले आहे.

गोट्या आणि लोट्या ह्या दोन अज्ञानी तरूणांच्या हातात एकाच्या हातात झेंडा व दुसऱ्याच्या हातात तलवार दिलेली असते. हातातील तलवार व भगव्या झेंड्याचे काय करायचे त्यांनाच माहित नसते. ते दोघेही एकाच सुरात वारंवार कार्यकर्त्यांना विचारत असतात "याचं काय करायचंय??" असं म्हटलं की जनतेत हशा पिकतो. गोट्या- संघराज वाघमारे आणि लोट्या-किशोर उढाण हे दोन पात्र रसिकांना हसवत ठेवतात; मात्र ह्या विनोदातूनही लेखकाने प्रश्न निर्माण केलेला आहे की, शिवरायांच्या कर्तृत्वाचे प्रतिक फक्त भगवा झेंडा आणि तलवारच आहेत का? शिवरायांच्या विचारांचं काय ? असा प्रश्न लेखकाने जनतेला विचार करायला भाग पाडलेला आहे. शेवटी गोट्या-लोट्याच्या हातात मिलिंद कांबळेचे सहकारी पेन आणि वही देतात म्हणजे बाबासाहेबांना अपेक्षित असलेला शिक्षणाचा विचार देतात.

धर्मा शाहीर आणि मिलिंद कांबळेच्या जुगलबंदीत धर्मा शाहीर धर्माचा बोलबाला रेटून सांगतांना मिलिंद कांबळे म्हणतो,"अरे तुमचा धर्माचा कोणता विचार घेऊन शिवबाने कोणती क्रांती केली ? ते जर धर्माच्या तालावर चालले असते ना

तर जीवाजी नाव्ह्याच्या हातात वस्तराच असला असता...त्या शुद्राच्या हातातला वस्तरा काढून महाराजांनी क्षत्रियाची तलवार दिली." या उत्तराने धर्मा शाहीराची बोलती बंद होते.

शिवशाहीत कर्तबगारांना कर्तबगारीचीच कामे दिली जात होती, मग तो शुद्र असो की,अतिशुद्र त्याची जात त्याचा धर्म पाहिला जात नसे म्हणून शिवरायांनी सर्व शिवसैनिकांना 'मावळा' हा शब्द वापरलेला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने जसा शुद्राच्या हातातला झाडू काढून कलेक्टरचा,न्यायधिशाचा पेन दिला. फौजदाराचा दंडा दिला, अंगावर वकिलाचा कोट दिला. हाच विचार शिवशाहीचा होता..असे लेखकाला या नाटकातून सांगावयाचे आहे. नाटकाच्या जुगलबंदीत धर्मा शाहीर म्हणतो, "शेवटी धर्मच मोठा धर्माच्या नावावर महाराज मोठे झाले.. आणि जे जे धर्माला धरून राहिले ते ते मोठे झाले.... मिलिंद कांबळे उत्तर देत म्हणतो," धर्माच्या नावावर महाराजांना नाही,.. तर धर्माला मोठं होण्यासाठी महाराजांची गरज भासली... जे जे मोठे झाले त्यांना धर्माच्या कंपूत ओढलं..ज्ञानेश्वर असोत, तुकाराम असोत किंवा विष्णूचा नववा अवतार माथी मारलेला गौतम बुध्द असो.....कर्तृत्वाची ओळख नसणाऱ्यांना धर्माची ओळख मोठी वाटते.

या नाटकात चिंतनशील, चिकित्सक व अभ्यासपूर्ण संवादातून धर्मांध व्यवस्थेचे विच्छेदनच केलेले दिसून येते. इथे मला अण्णाभाऊं साठे यांचा धर्माला हादरा देणारा विचार आठवतो, ते म्हणतात, "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दलित श्रमिकांच्या तळहातावर पेललेली आहे." तसेच हे नाटक शिवरायाच्या,भीमरायाच्या चरित्रावर बसवलेलं नसून ते त्यांच्या कर्तृत्वाच्या खऱ्या विचारावर आधारित आहे, असं मी म्हणेन.!

लेखकाने या नाटकात पाशा नावाचे पात्र आवर्जून टाकले आहे. तो या सर्वांसोबत मिळून मिसळून वागत असतो. तो कोणत्याही गोष्टीचा विरोध करीत नाही. तो नेहमी सावरासावरीची भाषा करतो, लीनतेची भूमिका घेतो. याद्वारे मुस्लिम समाजाला पोटापाण्याचे प्रश्न महत्वाचे वाटतात म्हणून तो भांडण आणि दंगली पासून दूरच राहतो.. अशी 'पाशा' नामक पात्राची भूमिका राजू सावंत यांनी चांगली वठवली आहे. यात गरीबदास व युवा नेता असणारे मधुकर बिडवे व गजेंद्र तांगडे यांचीही भूमिका तेवढीच महत्वाची आहे. या नाटकात तात्विक चिंतन आणि तात्विक विनोद आहे ..एक प्रसंग असा "जेव्हा आजोबा येतात तेव्हा वैशाली झोपून इतिहासाचे पुस्तक वाचत असते तेव्हा आजोबा म्हणतात, "झोपून वाचायला ते काय कॉमिक्स आहे का? इतिहास नेहमी जागेपणी वाचायचा असतो." ( टाळ्या ) पुढे वैशाली वाचतांना म्हणते, "थोडक्यात उत्तरे लिहा आणि पुढे लगेच वाचते, "शिवाजी महाराजांची कार्ये किती. ? यावर आजोबा म्हणतात, " शिवाजी महाराजांची कार्ये किती ? आणि थोडक्यात लिहा.. ? ( टाळ्या ) हाच तो तात्विक चिंतनातून आलेला विनोद. याचवेळी छोटी वैशाली विचारते,"आजोबा पुस्तकातली उत्तरे खरी असतात का हो?" आजोबा सौम्य भाषेत म्हणतात, "ते लिहिणाऱ्याच्या नियतीवर असतं." ( टाळ्या ) पुस्तकं, ग्रंथ मनानं लिहिली म्हणून तर एवढी वाट लागली समाजाची....असा बराचसा संवाद रसिकांची कानउघाडणी करणारा या नाटकात ऐकावयास मिळतो. नाटकाच्या शेवटी सर्व मावळे कलावंत आणि सस्पेंड असलेला यमही येतो आणि हा आपल्या हातातील शिवाजी महाराजांचा जिरेटोप जमिनीवर ठेवत म्हणतो महाराजांचे विचार आता सर्व जनतेत पसरले आहेत म्हणजे महाराज सगळीकडेच आहेत मी महाराजांना कुठे कुठे आणि कसा शोधू?" अत्यंत सुंदर विचार देणाऱ्या प्रसंगाने नाटकाचा शेवट केला आहे.

या नाटकाची संकल्पना गीत, संगीत, पोवाडे हे सुप्रसिद्ध शाहीर संभाजी भगत यांचे असल्याने हे नाटक लोककलेच्या अंगाने जाते. या नाटकाची संहिता भूत, भविष्य आणि वर्तमान काळातील सामाजिक प्रश्नांचा गुंता करत प्रेक्षकांना खिळवून ठेवते.

या नाटकात या अगोदर मिलिंद कांबळेची भूमिका अभिनेता कैलास वाघमारे यांनी व सावित्रीची भूमिका मिनाक्षी राठोड या दोन कलावंतांनी दीर्घकाळ केलेली आहे. या नाटकातील प्रत्येक कलावंत सांगत असतो की,"आमचा कोणताही कलावंत अखंड सोबत असो किंवा नसो; मात्र शिवरायांचा हा विचार पुरोगामी महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम या नाटकाच्या माध्यमातून होत राहणार आहे. महाराष्ट्रातील जनतासुद्धा शिवरायांचा खरा इतिहास जाणून घेण्यासाठी आतूर आहे." हे कलाकार हेही सांगतात की, प्रत्येकाच्या घरात जसा शिवरायांचा फोटो असतो तसा शिवरायांचा विचारही प्रत्येकाच्या मनामध्ये असला पाहिजे, तो रुजला पाहिजे यासाठी हे नाटक आपण सर्वांनी पाहिलेच पाहिजे.

लोककलेच्या अंगाने जाणारे हे व्यावसायिक नाटक एका नव्या ज्वलंत आणि संवेदनशील विषयाला निर्भिडपणे हात घालते. आणि सातशेच्या वर प्रयोग करते. खरेतर निख्खळ विनोदी नाटकाचे प्रयोगही पाचशेच्या पुढे जात नाहीत.. परंतु "शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला" हे नाटक शिवरायांचा व भीमरायाचा परिवर्तनाचा विचार घेऊन रंगमंचावर सातशेच्या वर प्रयोग करते ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.



या नाटकातील संगीत,आणि कडक गाणी शाहीर संभाजी भगतांची असल्यामुळे हे नाटक पाहतांना आंतरिक उल्लास टिकून राहतो.

वैचारिक संवादांसोबतच गंभीर विनोदाच्या बळावर शेवटपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात कलावंत यशस्वी होतात. सर्वच कलावंतांच्या भूमिका महत्वाच्या असून जो तो स्वतःला शिवरायांचा मावळा समजून आपली भूमिका पोटतिडकीने करत असतो. म्हणूनच या नाटकाचे प्रयोग सातशेच्या पुढे गेलेले आहेत... कारण हे नाटक नसून एक विचार आहे आणि हा विचार प्रसारीत करण्याचं व्रत ह्या कलावंतांनी हाती घेतलेलं आहे, ही लोकप्रबोधनाची वास्तवदर्शी लोकचळवळ आहे. ती चळवळ अखंड पुढे जावो.! यापुढेही या नाटकाचे हजारो प्रयोग होवो, यासाठी सर्व कलावंताना मनस्वी खूप शुभेच्छा..!

**लेखक- सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक आहेत.**

# स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी इंदिराबाई पहिल्या महिला आमदार

आधुनिक केसरी


**स्त्री  पुरूषोंसे अधिक बुद्धिमान होती है, क्यो कीं वो पुरुषों से कम जानती है, किंतु उससे अधिक समझती है... काल जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यात अनेक कर्तबगार महिलांनी आपले नाव  सुवर्णाक्षरांनी  कोरलेले आहे. बुलढाणा जिल्ह्याची लेकबाळ असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊंनी दोन छत्रपतींना घडविले, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक विचारांच्या पुरस्कर्त्या असणाऱ्या आणि 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिणाऱ्या ताराबाई शिंदे असतील, ह्या कर्तबगार महिलांसह राजकीय क्षेत्रात जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केलेल्या स्व.इंदिराबाई कोटम्बकर, स्व.श्रद्धाताई टापरे, स्व. सुमनताई पाटील, सौ. रेखाताई खेडेकर तर विद्यमान आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील असतील ह्या सर्वांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण घडामोडीत आपले योगदान दिले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १९ फेब्रुवारी ह्या जन्मतारखेवर शासन पातळीवर शिक्कामोर्तब करण्याचे महत्वाचे काम करणाऱ्या आणि मंत्रालयात राष्ट्रमाता जिजाऊ यांचे तैलचित्र ज्यांच्यामुळे लागले त्या रेखाताई खेडेकर असतील ह्या सर्वच महिलांनी बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**



माझं बालपण  आमदार मंडळींच्या सानिध्यात गेलेलं. मला न कळत्या वयापासून बुलढाण्याच्या दुसऱ्या महिला आमदार सौ. सुमनताई पाटील यांच्याबद्दल विशेष आपुलकी. सौ सुमनताई पाटील यांनी मला सांभाळले, माझा लाड केला.माझे वडील स्व. रा. ना. पवार आणि माजी मंत्री स्व. शिवाजीराव पाटील यांचे मैत्रीपूर्ण संबंध हे जिल्ह्याला सर्वश्रुत. माझे वडील बुलढाणा येथे उपशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असतांना स्व. सुमनताई पाटील यांचे आमच्या घरी येणे जाणे. माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांच्या मातोश्री भानुमतीताई सपकाळ, माझी आई दुर्गाबाई पवार यांची आणि सुमनताई पाटील यांची चांगली मैत्री. ( म्हणूनच माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ मला मावस भाऊ म्हणतात ) ही मैत्री शेवटपर्यंत कायम राहली. माझे बाबा सुल्तानपूर ला मुख्याध्यापक म्हणून जेव्हा रुजू झाले त्यावेळी स्व. सुमनताई पाटील यांनी लोणार आणि सिंदखेडराजा बघण्यासाठी त्यावेळच्या ७ महिला आमदारांना  इकडे आणले होते.त्यावेळी ह्या सात ही महिला आमदार आमच्या सुल्तानपूर येथील घरी आल्या होत्या. त्यात स्व. केशरकाकू क्षीरसागर यांचा देखील समावेश होता.

जगाराव चव्हाण लोणार मतदारसंघाचे आमदार, ते बाबांचे वर्गमित्र व रूम पार्टनर, जे के खरात बाबांचे सहकारी, दोघेही एकाच संस्थेवर मुख्याध्यापक, संस्थाध्यक्ष भाऊसाहेब लोढे हे देखील आमदार, खामगावचे गावंडे आमदार बाबांचे मित्र, शेकाप चे आमदार भास्करराव शिंगणे बाबांचे मित्र, ह्या सर्वांच्या प्रचाराची प्रमुख धुरा बाबांच्या खांद्यावर असायची. ह्या सगळ्या गोतावळ्यात माझे बालपण गेले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अनेक कर्तबगार महिलांचा धांडोळा घेत असतांना  मातृतीर्थ जिल्ह्याची बहिणाबाई अशी ओळख असलेल्या सावरगाव डुकरे येथील स्व. गोदावरीबाई पाटील असतील, दारूबंदी चे काम करणाऱ्या प्रेमलता सोनुने, सौ वृषाली बोन्द्रे असतील तर अलीकडच्या पिढीतील मुलींच्या मासिक पाळी संदर्भात काम करणारी माधुरी देवानंद पवार असेल यासह ज्यांच्या नावांचा उल्लेख होऊ शकला नाही अशा कित्येक महिलांचे कार्य जिल्ह्याचा मान वाढविणारे आहे. मात्र पहिली महिला आमदार म्हणून नाव येते ते इंदिराबाई कोटम्बकर यांचे. इंदिराबाई यांनी तब्बल 10 वर्ष बुलढाणा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या मूळ रहिवासी नसतांना देखील बुलढाणा येथील पहिल्या महिला आमदार म्हणून त्यांचे नाव इतिहासात कोरल्या गेलेलं आहे.

माहेरची गोदूबाई असणारी इंदिराबाई ह्या त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण झालेल्या.जितक्या प्रेमळ तितक्याच कडक शिस्तीच्या भोक्त्या.आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावं, इंग्रजाच्या पारतंत्र्यातून आपला देश बाहेर पडावा यासाठी इंदिराबाईंनी विद्यार्थी दशेत अनेक चळवळीत भाग घेतला.




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र. : 9422880080

इंदिराबाईंचे वडील त्यांचे माहेर तसे सातारा जवळील सुरुर.पण वडील सयाजीराव महाराज संस्थान बडोदा येथे मेजर म्हणून गेले. विवाह हा वर्धा जवळील कोटम्बा येथील रामराव कोटम्बकर यांच्याशी झाला. रामराव कोटम्बकर हे त्याकाळचे एल एल बी. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीने प्रभावित झालेले. सत्यशोधक विचारसरणीची माणसं राजकीय व्यवस्थेत असली पाहिजे, सत्तेत सामील झाली पाहिजे हा विचार समोर ठेवून महात्मा फुले यांनी सत्यशोधक परिवारातर्फे रामराव कोटम्बकर यांना विधानसभेची उमेदवारी दिली, त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर कौन्सिल चे सदस्य म्हणून रामराव कोटम्बकर बुलडाणा येथे आले.स्व पंढरीनाथ पाटील , स्व. खा. लक्ष्मण भटकर सारख्या जुन्या राजकारणी मंडळींशी त्यांचा परिचय झाला. कौन्सिल चे सदस्य असल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य शेतकरी यांच्यासोबत संपर्क वाढलेल्या रामराव कोटम्बकर यांनी काँग्रेसच्या वतीने पत्नी इंदिराबाई यांच्यासाठी उमेदवारी मागितली, स्वतः इंदिराबाईंनी देखील वरिष्ठांना पत्र पाठविले आणि त्यांना उमेदवारी मिळाली.१९५७ ते १९६७ ह्या १० वर्षाच्या काळात त्यांनी बुलढाण्याच्याच नव्हे तर जिल्ह्याच्या पहिल्या आमदार म्हणून काम केले. मायाळू, कडक शिस्तीच्या, महात्मा फुले, महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या, गोदावरीबाई अर्थात इंदिराबाई यांनी आपली कारकीर्द चांगल्या प्रकारे भूषविली.

इंदिराबाईना चार अपत्य, एक पद्मावती प्रल्हादराव गावंडे, दुसरे अपत्य असिस्टंट कमिश्नर म्हणून सेवानिवृत झालेले सुरेश कोटम्बकर हे वर्धा येथे राहतात. तिसरी मुलगी आशा गावंडे यांचे निधन झाले आणि चवथे अपत्य चंद्रकांत कोटम्बकर

यातील मोठी मुलगी पद्मावती यांचे पती  प्राचार्य पदावरून श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती च्या पातूर येथील शाखेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी बुलडाणा शहर निवडले, त्या इथेच राहतात.स्व माजी आमदार इंदिराबाई यांची मोठी मुलगी पद्मावती गावंडे यांचे वय  वर्ष ९०. त्याकाळात एम ए मराठी च्या पहिल्या वर्षापर्यंत त्या शिकल्या.आजही स्मरणशक्ती दांडगी. आपल्या आईच्या कारकिर्दीविषयी भरभरून बोलतात. ९० व्या वर्षी देखील त्यांच्या चेहऱ्यावरील तेज, त्यांची स्मरणशक्ती अचंबित करणारी.मुलगी एव्हडी हुशार तर इंदिराबाई देखील किती हुशार असतील असा विचार डोक्यात येतो.

मूळच्या बुलढाणा येथील नसतांना देखील बुलढाणा जिल्ह्याच्या पहिल्या महिला आमदार होण्याचा त्यांना बहुमान मिळाला.त्यानंतर स्व. सुमनताई पाटील यांना उमेदवारी मिळाली, पण कुठलाही किंतु परंतु मनात न ठेवता स्व. सुमनताई पाटील यांच्या प्रचारात त्या पदर खोचून उभ्या होत्या, हे आजच्या सूडाच्या राजकीय काळात कुणाला सांगितले तर खरे वाटणार नाही. धोरणी, अभ्यासू, शिस्तप्रिय ह्या व्यक्तिमत्वाने १५ जून २००४ रोजी जगातून निरोप घेतला.

असं म्हणतात की, **प्रत्येक देश के दो पंख होते है, एक स्त्री और दुसरा पुरुष... देश की उन्नती एक पंख से उडान भरने पर नही हो सकती**

# अंधश्रद्धेचा संबंध धर्माशी जोडण्यात काय अर्थ ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा संताची भुमी आहे. याभुमीमध्ये अनेक महान मानवतावादी संत होऊन गेले. सर्वांचे नाव घेणे किंवा प्रत्येकांचे दाखले देणे एका लेखात किंवा व्याख्यानात शक्य नाही म्हणून भावार्थ समजून घेणे महत्वाचे आहे. अनेक संत या देशात होऊन गेले. संताची शिकवण ही  जनकल्याण केंद्रीत असून समाजातील अघोरी पाखंडी व अंधश्रद्धा दुर करून समाजाला योग्य ती दिशा देऊन आदर्श जिवन जगण्याचा मार्ग देण्याचे काम केले आहेत. संत हे सर्व जास्तीत जास्त हिंदु धर्माचेच होते. परंतु संताचा अभ्यास करताना किंवा संत समजून घेताना धर्म कधीच बघितला नाही तर त्यांचे कर्म बघुन आजही देशातील समाज त्यांना वंदन करतो.**

संत समाजाचे मार्गदर्शक असतात सत्य असत्यामधला फरक करून सत्याचा व मानवतावादाचा स्विकार करून जनतेचा सर्वांगीन विकास कसा होईल यावर लक्ष केंद्रित केले जाते.

परंतु याच संताच्या देशात भोंदुगीरीला आणि भोंदु लोकांना उधाण आले आहे. चमत्कार व मंत्राच्या साह्याने हे लोक स्वतः च समस्या सांगतात आणि स्वतः च समस्याचे निदान करतात. स्वतः ला देवाचे दुत समजाणारे भोंदु समाजातील लोकांकडून करोडो ची माया जमा करून आपल्याला पिढ्यांनपिढ्यांची कमाई करून बसतात आणि सर्वसामान्य लोक आपल्या समस्या दुर होतील, देवाचा दुत आहे म्हणून कमावलेली माया वेळ प्रसंगी कर्ज काढून भोंदुला देतात. सर्वसामान्य जनतेकडून पैसे उकळायचे त्यांना राख द्यायची चमत्कार दाखवायचे ही परंपरा संताची मुळीच नाही. संत कबीर, संत रविदास महाराज, संत सावता माळी, संत सेवालाल महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत गाडगेबाबा आणि इतरही बरेच संत होऊन गेले यांनी समाजाला दिशा दिली म्हणून आजही हे संत वंदनीय व आदरनीय आहेत. या संतानी कधीच कोणाला राग दिली नाही, कधी चमत्कार करून दाखवला नाही, कधीच गोरगरीब जनतेकडून किंवा कोणत्याही व्यक्तीकडून दुख दूर करण्यासाठी, संकट दुर करण्यासाठी कोणते होम हवम वा कोणतेही दरबार भरवून उपचाराचे ढोंग केले नाही. या संताची शिकवण आजही आम्हाला मार्गदर्शक व दिशादर्शक असताना याच संताच्या भुमीत हे भोंदु तयार होत आहेत. हे नेमके कोणत्या धर्माचे आहेत ? सर्वात महत्वाचे म्हणजे जसे गुन्हेगारांना कोणताच धर्म नसतो तसेच या भोंदु लोकांचे असते. भोंदु लोकांचा कोणत्याही धर्माशी संबध जोडणे योग्य आहे. जर भोंदु आणि पाखंडी लोकांचा संबंध धर्माशी जोडला तर त्या भोंदुने केलेल्या दुष्कृत्याची जबाबदारी ही त्याच धर्माला घ्यावी लागते. भोंदुची भोंदूगिरी उघड झाल्यावर हा धर्माचा अवमान आहे असे बोलले म्हणजे चुकिच्या प्रवृत्तीचे समर्थन करणे व वैचारिक अपंगत्व दाखवणे होय. आजचे भोंदु राख चमत्कार मंत्र याद्वारे सर्व काही सांगतात. काही भोंदु तर म्हणतात आणि मोबाईल नंबर, बँक अकाऊंट नंबर सांगतो, काही भोंदु तर सर्वासमोर महिलांना दमदाटी करून म्हणतात तुमचे लपडी मला माहिती आहेत. सर्वांसमोर एखाद्या महिलेल्या अशा शब्दांत बोलण्याची परवानगी कोणताच धर्म कोणत्याही व्यक्तीला देत नसेल मला वाटतं. जो भोंदु महिलेचा सन्मान करू शकत नाही तो कोणत्या धर्माचा कसा असु शकतो ? महिलेला अपमानीत करणारा भोंदु म्हणतो मला या देवाचे वरदान आहे या देवाची सिद्धी आहे मग प्रश्न उपस्थित होतो महिलेचा अवमान होताना देव शांत कसा ? आणि यावर बरीच चर्चा समोर होऊ शकते. परंतु आपण फक्त भोंदुगीरीवरच कायम राहुन बघुया. भोंदु लोक धर्माचे नाव घेऊन गोरगरीब लोकांना लुटतात,  महिलेला अपमानीत करतात, दरबारामध्ये महिला मरतात, महीला गायब होतात तरीही लोकांची बुद्धी काम करत नसेल तर त्यांना गुलामच समजावे. या पाखंड, अंधश्रद्धा, चमत्कार राख यावर आमच्या आदरणीय संतानी काय प्रबोधन केले हेही बघणे आवश्यक आहे. आणि वंदनीय संताच्या विचाराच्या विरोधात जर कोणी कारवाया करत असेल तर त्याला थांबवने हे जागृत मानसाचे काम असते. भोंदु लोकांविषयी संत तुकाराम महाराज म्हणतात.. **अंगा लाऊनी राख। डोळे झाकुनी करतो पाप** सध्या अशाच भोंदु ची संख्या वाढलेली आहे. स्वतः ला सिद्धी आणि चमत्कारी म्हणून घ्यायचे आणि लोकांची लुट करून अनेक पाप करायचे. पापी कितीतरी भोंदू जेलमध्ये आहेत. अशा पापी आणि बलात्कारी लोकांचा संबंध धर्माशी जोडुन नेमके काय साध्य करायचे असते ? बलात्कारी भोंदू मध्ये ज्यांना सिद्ध पुरुष दिसतो त्यांनी नक्कीच त्याची तनमनधनाने सेवा करावी परंतु त्याचा संबंध धर्माशी जोडल्याने धर्म मलीन होतो, दुषीत होतो याची जाणीव लोकांना कधी होणार ? अनेक भोंदु आजही लोकांना काही कर्मकांड काही नवस करायला सांगतात अर्थात हे पैसे देऊन असतात. मोफत काहीच होत नाही. नवस आणि कर्मकांड करून मुल होत नाही म्हणून संत तुकाराम महाराज महाराज म्हणतात.. **नवसे कायास कन्यापुत्रे होती। का करने लागे पती।**

नवस केल्याने जर लेकरं होतात पती करण्याची गरजच नाही असे स्पष्ट मत संत तुकाराम महाराज यांनी मांडून समजातील अंधश्रद्धेवर प्रहार केला.

देवाच्या नावावर भोंदु लोक लोकांची आर्थिक व मानसिक पिळवणूक करतात. जर देवाची



सर्वजन लेकरे आहेत. देवांना सर्वजन सारखे आहेत तर देव एखाद्या व्यक्तीलाच दिव्य शक्ती का देतो ? देव माणसाच्या सत्कर्मात व मावनतेत, श्रमामध्ये आहे तर दगडाची पुजा करताना आर्थिक पिळवणूक का होते ? म्हणून संत कबिर म्हणतात.. **जत्रा मे बिठाया फत्रा। तिरथ बनाया पाणी पैसो की धुलधानी। दुनिया हुई दिवानी**

थोडक्यात काय तर पाखंड आणि त्या नावाखाली होणारी लुट थांबुन अंधश्रद्धेत खर्च होणारा पैसा शिक्षण आरोग्यासाठी खर्च झाला तर जिवन सुधारेल या भावनेने संताचे प्रबोधन असायचे. आज अनेक भोंदु लोक बलात्कार करून जेल मध्ये गेले याबद्दल तुकाराम महाराज यांनी अगोदरच लिहुन ठेवले परंतु संत तुकाराम महाराज वाचायला वेळ कोणाकडे आहे.
**परनारी देखोनी ज्यांचे। चंचळ झाले चित्त
टिळा टोपी घालुनी माळा। म्हणती आम्ही साधु
दयाधर्म चित्ती नाही। जानावे ते भोदु**

फक्त टीळा टोपी घालुन कोण साधु होत नाही. ज्याच्या अंगी दया नाही ते भोदु असतात हे तुकाराम महाराज यांनी अगोदरच सांगितले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशा भोंदु लोकांविषयी म्हणतात.. **घरी देवाचा कट्टर पुजारी ।असत्य करीत असे बाजारी** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची वरील ओवी लक्षात घेऊन त्यावर चिंतन करणे आवश्यक आहे कारण त्यावर चिंतन झाले तर भोंदु लोक लवकर लक्षात येतील. देव हा आपल्या कर्मामध्ये गोलगरिबांच्या सेवे मध्ये असतो अशी शिकवण सर्वच संताची आहे परंतु देवाचा अतिरेक करून जेव्हा भक्ती केली जाते तेव्हा होते  संत तुकडोजी महाराज म्हणतात.. **देव देवळी दगडाचा ।देवपाट करीती सोन्याचा धाक पडे चोरट्यांचा। म्हणोनी पहारे देवुळी** देव आणि देऊळ दगडाचे असले तरी देवपाठ मात्र सोन्याचा असतो आणि त्यावर चोराची नजर असते म्हणून देवळावर राखणदार ठेवावा लागतो. थोडक्यात काय तर देवळात मठात देव मिळणार नाही याच अर्थाने संत तुकडोजी महाराज वरील ओवी लिहतात. चमत्कार केल्याने कुणाचेही भले होत नाही भले होण्यासाठी कर्म करावे लागतात आणि काही लोक भक्तीच्या नावाखाली लोकांना भिकारी बनवतात या आशयाने संत तुकडोजी महाराज लिहतात..
**काही वर्गणी करोनी गोळा ।गावी करीती भक्ती सोहळा** आणि या चमत्कारावर बोलताना संत तुकडोजी महाराज म्हणतात **वास्तविक संत नव्हे जादुगार। करावया चमत्कार
हा तो चालत आहे व्यवहार। पोटभऱ्यांचा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वाचले असते आणि डोक्यात बसले असते तर चमत्कार करून माया गोळा करणारे भोदु तयारच झाले नसते. परंतु शोकांतिका आहे आम्ही संत कधी वाचले नाही. संताचे विचार कधी ऐकले नाही. आणि जे लोक धर्माच्या नावाखाली धंदा करतात त्या लोकांचे ऐकुन भोंदु लोकांचा धंदा चांगला चालतो परंतु यामध्ये समाजात अंधश्रद्धा, पाखंड कायम टिकून राहते. पाखंड आणि अंधश्रद्धा जोपर्यंत आहे तो पर्यंत यांचा धंदा जोरात राहणार आहे. धर्माच्या नावाखाली धंदा करणाऱ्यांना सर्व श्रेष्ठ मानावे हे कोणत्या धर्माची शिकवण आहे. जर अशी शिकवण कोणत्याही धर्माची नसेल तर या भोंदु लोकांना धर्माशी न जोडता संताच्या विचाराप्रमाणे आम्ही का राहत नाहीत ? भोंदुगीरी आणि पाखंडाच्या आहारी जाऊन अंधश्रद्धा व पाखंड यालाच सर्वस्व माणणाऱ्या बद्दल राष्ट्रसंत गाडगेबाबा म्हमणात..
**गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला
सांभाळ तुझ्या लेकराला। पुण्य समजती पापाला**

अंधश्रद्धा पाखंडापासुन दुर राहण्यासाठी आमच्या संतानी योगदान देऊन समाजाला जागृत केले. संतानी अंधश्रद्धा निर्मूलन वा पुर्तीपुजेच्या आडून होत असलेल्या आर्थिक व मानसिक शोषणाला कधीच धर्माशी जोडले नाही. त्यांनी धर्माचे नावही घेतले नाही. मग आजच अंधश्रद्धा पाखंड आणि भक्तीमेळाव्याच्या नावाखाली लुट होत असताना कोणी बोलले तर त्याचा संबंध धर्माशी नेमका कोण जोडतो ? पाखंड चमत्कार अंधश्रद्धा थोतांड हे धर्माशी निगडित नाही म्हणून अंधश्रद्धा पांखड चमत्कार या विषयी चुकीच्या लोकांकडून ऐकल्यापेक्षा आपल्या संताचे साहित्य अभ्यासावे म्हणजे डोक्यातुन अंधश्रद्धा व पाखंड निघेल आणि लोकांची भोंदुगीरी लक्षात येईल.

# जगद्गुरू तुकोबांचा अमृतोत्सव !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068


आधुनिक केसरी

**स्वतःचे मरण डोळ्याने पाहून आपल्या संघर्षशील जगण्याचा अमृतोत्सव साजरा करणारा एकमेवाद्वितीय संत कवी म्हणजे जगद्गुरू संत तुकाराम! संसारात राहून, भोवतालच्या माणसांशी वागून अभंग-कीर्तनातून लोकव्यवहार कथन करणारा सामान्यातील असामान्य महापुरुष तुकोबाराय! जेमतेम बेचाळीस वर्षांचे आयुष्य लाभलेले तुकाराम काय काय लिहून-बोलून जातात? समोरील आव्हानांचा भलामोठा पहाड आणि संघर्षातून दिलेली उत्तरे म्हणजे तुकारामोत्तर लोकांच्या जीवनाला अजीवन पथगामी ठरणारी आहेत.**

सतरावे शतक, कडेकोट वर्णव्यवस्था यातून मोठ्या कौशल्याने मार्ग काढत तुकोबा पुढे जातात. आपले अभंग बुडविले तरी कुणालाही एक शब्द न बोलता ज्यांच्यासाठी लिहिले होते त्यांच्याकडेच जाऊन आपली कैफियत मांडतात. त्यांचे अभंग खऱ्या अर्थाने अभंगच राहिले, कारण ते लोकांच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनले. आलेले अनुभव सरळ, साध्या लोकभाषेत कथन करून समाजमंथन करण्याचे महत्कार्य तूकोबांनी केल्यामुळेच जनसागराच्या मनपटलावर अभंग तरले आणि त्यानंतर खराखुरा तुकाराम लोकांसमोर आला. आपल्या लोकसंवादी कीर्तनातून वारकरी विचार प्रकट करतांना महाराजांनी लोकनाडी ओळखली. कर्मकांडांचे माजलेले स्तोम, जातीभेद, बुवाबाजी, जादूटोणा आणि कडेकोट वर्णव्यवस्थेने घायाळ झालेला सामान्य माणूस सुखासाठी रानोमाळ पळत होता. धर्माच्या नावाखाली माणूस पिचला, सैरभैर झाला होता. सत्य-असत्य यात फरक कळायला मार्ग नव्हता. अशा कठीण परिस्थितीत संत तुकारामांनी आपल्या अभंग विचारांनी सर्वांगीण, विवेकी धर्मक्रांती घडवून आणली. तेराव्या शतकांत ज्या उद्देशाने वारकरी संप्रदाय पुनरुज्जीवित झाला तो उद्देश रुजविण्याचे महत्तम श्रेय सतराव्या शतकात संतश्रेष्ठ तुकारामांनाच जाते. म्हणूनच "यारे यारे लहान थोरं। याती भलत्या नारीनर॥" उद्देशाने आणि "बुडते हे जन न देखवे डोळा। येतो कळवळा म्हणोनिया॥" हे शब्द लिहिणारे तुकोबारायच अलीकडच्या काळातील बहुजणांचे उद्धारक ठरतात! संसारातील अनेक दुःखाचे, कठीण प्रसंग तूकोबांनी स्वतः झेलले परिणामी ते त्याविषयी सहजच बोलले! यामुळेच ते सर्वसामान्य माणसाच्या हृदय सिंहासनावर सर्वकाळ आरूढ झाले. "नवसे कन्यापुत्र होती। तरी का करणे लागे पती॥" असे दैनंदिन जीवनातील सोपे सिद्धांत मांडून "तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी ॥" हे कंबर बांधून, दगडाचे टाळ वाजवून कीर्तनातून प्रतिपादन केल्यानंतर लोक तुकोबांना ऐकायला येऊ लागले. आपल्यातीलच असलेला सामान्य संसारिक-व्यावहारिक माणूस रोजच्या जीवनातले धडे-दाखले देऊन आपल्याला आनंदी रहायला सांगत आहे. कोणताही सौदा न करता, सुख-दुःख ह्या संसार नाण्याच्या दोन बाजू असून त्यातून गेल्याशिवाय खरा संसार कळणारच नाही असे सांगणारा आपला माणूस लोकांना भेटला. हातोहात याचा प्रचार-प्रसार झाला आणि कीर्तनाला लोक जमू लागले. हे मोठे क्रांतिकारी पाउल होते.

तुकोबांच्या अभंगांना अनंत धुमारे फुटतांना तुकोबा सहजच लोकप्रवाही होऊन जातात. तुकोबांची अभिव्यक्त भाषा ही लोकभाषा असल्यामुळे सामान्यांच्या भावना त्यांच्या अभंगांतून सहजतेने प्रवाही होतात. एकाचवेळी तुकोबा अनंत पातळ्यांवर कार्यप्रवण होतांना त्यांच्यातील रोखठोकपणा दृष्टीआड होत नाही. उपदेश करतांना मेणाहून मऊ होऊन उपदेश करतात आणि नाही ऐकल्यास नाठाळाच्या माथी काठी हाणायला सुद्धा ते मागे पुढे पहात नाहीत. शब्दांच्या शस्त्रांनी वार करणारे तुकोबा मात्र प्रत्यक्ष लोकांशी दोन हात करायला कमी पडतात. याचा परिपाक असा झाला की; त्यांना धर्ममार्तंडांचा मार खावा लागला. हे होतांना मात्र त्यांची अभंगानुभूती सहजच फुलतांना दिसते. ते असे सहजच का लिहितात? याचे उत्तर "आपुलिया बळे नाही मी बोलत। सखा भगवंत वाचा त्याची ॥" किंवा "सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मते। बोलिलो बहूते कळावया ॥" असे त्यांच्या अनेक अभंगांतून वाचायला मिळते. संत तुकारामांच्या अगोदर आणि नंतरही अनेक कवी लेखक होऊन गेले, मात्र तुकोबांची ही लोकसंग्रही आणि लोकप्रवाही शैली बऱ्याच लेखकांना हाताशी आलेली दिसत नाही. कित्येकांचा उगम आणि अस्त केंव्हा झाला( ? ) हे कळले सुदा नाही, परंतु अनेक टक्के टोणपे झेलून, वाऱ्या-पावसात त्यांच्या अभंग गाथ्याने आपले अस्तित्व टिकवून ठेवले. याउलट काळाच्या ओघात तुकोबांचा अभंग गाथा पहिल्यापेक्षाही जास्त प्रभावी आणि प्रवाही होतांना दिसतो. दिवसेंदिवस तो उजळत राहिला. असे महद्भाग्य लाखांत एखाद्याच कवी अथवा लेखकाच्या नशिबी असते, आणि त्याला तुकोबा अपवाद राहिले नाहीत. त्यांच्यासमोर अनंत अडचणी उभ्या असतांना व्यतीत झालेले संघर्षमय, खडतर जीवन आणि त्यातून जन्मलेला एकएक अभंग लोकांच्या काळजावर कोरला गेला! याचा परिणाम म्हणजे ज्यांना संतवाङ्मय आणि वारकरी सांप्रदायाचा कसलाही अभ्यास अथवा संबंध नसतांना अनेकांच्या ओठी तुकोबांचे अभंग लीलया ओसंडून वाहतांना पाहून आश्चर्य झाले नाही तरच नवल!

महाराष्ट्रातील वारकरी आज संत तुकाराम बीज साजरी करत आहे. तुकाराम महाराजांच्या अखंड जीवनात पावलोपावली



संघर्ष पाहायला मिळतांना त्यांचे इहलोकातून जाणे सुद्धा अनेक प्रश्न उपस्थित करून गेले. त्यावर तूर्तास न बोलता हा महामानव आपल्यातून जाऊन जवळपास पावणेचारशे वर्षाचा भलामोठा काळ लोटला असतांना; हा लोककवी आपल्यासमोर अनंत प्रश्न आणि जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे देतो आहे. केवढी मोठी ही क्षमता? तुकोबांच्या गाथ्यातील एकाएका अभंगाचे सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास मराठी वाचकाच्या सहजच त्यांची तळमळ लक्षात येते. मी या अगोदर सुद्धा अनेकवेळा लिहिले आणि बोललो आहे की; एक लेखक-कवी-कीर्तनकार गेल्यानंतर अजूनही त्या माणसाच्या लेखणीच्या आणि जीवनाच्या ताकदीवर अनेकांनी लाखो रुपये कमावले, कमावत आहेत आणि कमावत राहतील! अनेकांनी अनेक ग्रंथ लिहिले, अनेक पदव्या संपादन केल्यात. एवढे होऊनसुद्धा तुकोबा आणखी तुम्हा आम्हाला जागवत आहेत. "केले उपकार सांगू काय। बाप न करी ऐशी माय॥" या ओळी तुकोबांना सर्वकाळ तंतोतंत लागू होतात. आज आपण तुकोबांचा वसा आणि वारसा चालवणाऱ्या वारकरी सांप्रदायातील लोकांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. बीड जिल्यातील कान्नापुर गावाभोवतालच्या १४ गावांनी एकत्र येवून आदर्श अखंड हरीनाम सप्ताह सुरु केला असून त्यात कोणताही झगमगाट नाही. कीर्तनकार-प्रवचनकार मंडळींना फक्त येण्याजाण्याच्या किरायाशिवाय एक रुपयाही बिदागी दिली जाणार नाही. भोवतालच्या गावातील लोकांनी घरून भाजी-भाकरी घेऊन यायची आणि अखंड हरीनाम सप्ताहात पंगत करायची. कोणताही बडेजाव न करता आज तुकाराम बिजेच्या दिवशी या आदर्श अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता होत आहे. आज अशा अखंड हरीनाम सप्ताहाची महाराष्ट्राला आणि वारकरी संप्रदायांस नितांत गरज आहे. शेतकऱ्याच्या मालाला भाव नसतांना लाखो रुपयांची पट्टी गोळा करून मनोरंजन करणाऱ्या महाराजांना हजारो रुपये देणे म्हणजे मूळ वारकरी कीर्तन परंपरेचा गळा घोटणे होय! तेंव्हा, तमाम कीर्तनकार आणि सप्ताह आयोजकांनी सावध होऊन हजारो रुपये मागणाऱ्या कीर्तनकारांना न बोलावता केवळ जाण्या-येण्याच्या खर्चात केवळ आणि केवळ अभंगातील तत्वे आणि संत चरित्र कथन करणाऱ्या लोकांनाच बोलवावे! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने जगद्गुरू तुकोबांचा वसा-वारसा पुढे घेऊन जाणे होय, खरी तुकाराम बीज साजरी करणे होय अन्यथा केवळ आणि केवळ व्यापार! जय तुकोबाराय!

**(टीप: लेखक हे कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**

# स्त्री काल, आज आणि उद्या

आधुनिक केसरी

**गावातील प्रतिष्ठित लोकांच्या साक्षीने योग्य मुहूर्त पाहून होळी पेटवली गेली.एकच जल्लोष.. एकच आवाज..' होळी रे होळी, पुरणाची पोळी ' परिसर एकदम दणाणून गेला. तेवढ्यात एका मोठ्या आरोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.' वाचवा , वाचवा, मला वाचवा...' होळीच्या मैदानाजवळ असलेल्या एका प्रतिष्ठित घरांमध्ये एका नवविवाहित तरुणीने स्वतःला पेटवून घेतले. बातमी वाऱ्याच्या वेगाने तात्काळ पसरली आणि जडत्वाच्या नियमाने तेवढ्याच वेगाने ती नष्ट झाली. होलिका दहन हे निमित्त लावून,दाखवून प्रकरण ते तिथल्या तिथे मिटवले गेले. मी घरी रात्री उशिरा आलो. घड्याळात टिकटिक असा आवाज चालूच होता.**

रात्रही अजगर गतीने संपत होती. डोक्यात विचारचक्र चालूच होते. आजही एका बाजूने स्त्रीदेवतांची पूजा तर दुसऱ्या बाजूने तिला होलिका बनवून जाळले जाते. स्त्री-पुरुष समानतेची आभासी प्रतिमा असलेल्या देशात, स्त्रीत्व पूजन एक ढोंग असणाऱ्या देशात उद्याची स्त्री ही कशी असेल ?

ती अशीच असेल का ? ती स्वतःला ओळखेल का ?' ती' तिने सोसलेल्या यातना तिला माहित आहे का ?' चूल आणि मूल 'या चौकटीतून ती बाहेर असेल का ? ती उद्यासाठी सज्ज आहे का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यात केव्हा मला झोप लागली कळलेच नाही. आजही आपल्याला वैदिक काळातील ( प्राचीन इतिहास ) विश्ववारा, गार्गी, जुहू ,मैत्रीगी यासारख्या विदुषींची उदाहरणे दिली जातात. मात्र त्या होत्या किती ? तर बोटावर मोजले जातील तेवढ्याच. पुढे काल पुढे काळ बदलत गेला रझीया सुलताना सारखी पहिली महिला शासक बनली. सतीप्रथा, जरठ विवाह, केशवपण, देवदासी, पडदापद्धती प्रथाच होत्याच ना. त्या काळात कोणी महिलांनी आवाज का उठवला नाही ? घड्याळांचा काटा पुढे सरकत गेला. सर्व सामान्य स्त्री ब्रिटिशांच्या विरोधात क्रांतिकारी बनल्या. झाशीची राणी लक्ष्मीबाई स्वतः लढून त्या धारातिर्थी पडल्या. आजही ' खूब लडी, खूब लडी, मर्दानी वह तो झाशीवाली राणी थी' आवाज अजूनही कानात गुंजतो आहे. कल्पना दत्त, सुनिता चौधरी यांनी शस्त्र हातात घेऊन ब्रिटिश विरोधात लढल्या. तसा घड्याळाचा काटा आणखी पुढे सरकत गेला तशी बोटावरची संख्या ही बोटाच्या पलीकडे गेला. त्याच महिला आनंदी जोशी पासून सौ. प्रतिभाताई पाटील पर्यंत त्यांचा प्रवास होत गेला. त्या पंतप्रधान झाल्या, मुख्यमंत्री झाल्या, न्यायाधीश झाल्या, क्रीडा क्षेत्रात ही नामवंत खेळाडू झाल्या पी टी उषा ,पी व्ही सिंधू ,मेरी कोम, मल्लेश्वरी यासारख्या अनेक महिलांनी भारताचे प्रतिनिधित्वही केले.संशोधनाच्या बाबतीतील त्या अव्वल आहेत. कल्पना चावला सारखी अंतराळवीर मुळे आपली छाती आज गर्वाने फुलते. एवढे असूनही आज स्त्रियांची अवहेलना हे चालूच आहे. आजही वर्तनमानपत्र पाहिले तर दररोज चार-पाच घटना स्त्रियांवर अन्याय, अत्याचारांच्या बातम्या त्यात असतातच.राष्ट्रीय एका सर्वेनुसार 2002 ते 2011 या ( मुक्तसंवाद ) कालावधीत प्रत्येक क्षेत्रात ही संख्या एक टक्के ने वाढली आहे.उद्या ही स्थिती कायम राहील का ? किंवा कमी होण्यासाठी काही करता येईल का ?तेही पाहणे महत्त्वाचे ठरते.

आज आणि काल अनेक महापुरुष होऊन गेले. असे म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या यशामागे एखाद्या स्त्रीचा हात असतो. मग स्त्रीचे कोणतीही रूप असो.' जिच्या हातात पाळण्याची दोरी, ती जगाचा उद्धार करी.' जसे छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवणारी त्यांची माता जिजाबाई, स्वराज्याची बीजे पेरणारी ह्या जिजाऊ होत्या. माझ्या शामला कुणी भित्रे म्हणू नाही म्हणून स्वतः विहिरीत ढकलणारी त्यांची आई आणि तोच शाम पुढे त्याच संस्काराने 'साने गुरुजी '. भिक्षा मागण्यासाठी गेलेले ज्ञानेश्वर त्यांना समाजाने चिडवले त्यांना भिक्षा तर दिलीच नाही. उलट त्यांच्यावर आरोप लावले. त्यांनी स्वतःला बंदिस्त केले. रडत बसले झोपडीत लहान छोटी बहीण मुक्ताबाई यांनी ताटी उघडा ज्ञानेश्वरा म्हणून त्यांना उपदेश केला.त्यातूनच पुढे जगविख्यात पसायदान त्यांनी लिहिले. कान्होपात्रा यांनाही त्यांच्या बहिणीने प्रेरणा दिली.महात्मा ज्योतिराव फुले यांना त्यांच्या समाजकार्यात ज्योती प्रमाणे जळणाऱ्या धगधगत्या निखारा म्हणजेच सावित्रीबाई होत्या. पतीसाठी शिक्षणास मदत करणाऱ्या, दुःखांचे अश्रू स्वतः गिळून भीमरावांना त्यांचा मागमुस ही न लागू देणाऱ्या रमाबाई आंबेडकर ह्या नऊ कोटीच्या माता झाल्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे कार्य चालू ठेवले तेव्हा स्वतःचे मंगळसूत्र विकून वस्तीगृहातील मुलांना खाऊ घातले ती म्हणजे त्यांची पत्नी लक्ष्मीबाई .खरच पडद्या आड राहूनही प्रेरणा देणाऱ्या, आत्मविश्वास देणाऱ्या स्त्रियांची विविध रूपे उद्याच्या स्त्रियांना मार्गदर्शक ठरेल. त्यातूनच त्या समाजाला दिशा ही देतील.आजची आणि उद्याची स्त्री सावित्रीची लेक होऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची घटना छत डोक्यात घेऊन उद्याच्या आधुनिक द्रोपदीच्या रूपात असणार .

**जुन्या झाल्यात कथा त्या नको प्रतीक्षा कृष्णाची मीच माझी भाग्यविधाती आधुनिक द्रौपदी** भारताची आधुनिक स्त्रीने खूप उंच गगन भरारी घेतली आहे. उद्या तीच भरारी आणखी उंच असेल. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालणारी उद्या नक्कीच पुरुषांच्या पुढे असतील.मागील दहावी बारावी चार-पाच वर्षात गुणवत्तेच्या बाबतीत मुली मुलीच पुढे आहेत.( महाराष्ट्र निकाल ) आयटी क्षेत्रातील संख्याच बघा ना ती आज शून्य वरून 7 ...वरुन 17टक्के... आज26 टक्के आली आहे. नोकरीच्या प्रत्येक क्षेत्रात



दिवसेंदिवस ही संख्या वाढत आहे. उद्या पण नक्कीच जास्त असणार .साक्षरता प्रमाणात ही संख्या 53% वरून 65 % झाली . प्रशासनात प्रशासकीय बाबतीत ही शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पासून तर लोकसभेच्या स्पीकर पर्यंत महिला आहेतच. त्या पण सक्षम. मंत्रिमंडळातही महिला आहे. ज्यांना कोणताच अधिकार नव्हता ते राजकीय वारसदार आहे. त्यामध्ये सुप्रिया सुळे, पंकजा मुंडे ,प्रियंका गांधी, सोनिया गांधी यांची नावे घेता येईल .महिला विकासासाठी स्वतंत्र महिला आयोग आहेच उद्या कदाचित पुरुषांसाठी असेल. स्त्रियांची ही प्रगती, हा विकास कदाचित पुरुषप्रधान संस्कृतीला मारक ठरणार. कारण मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहेत. त्या नोकरदार आहेत. सक्षम आहेत. स्वतःच्या पायावर उभे आहेत. त्यामुळे त्यांना लग्नासाठी स्थळ हे त्यांच्यापेक्षा वरचढच पाहिजे. त्यांच्या 'मागण्या ' मागण्याही अपेक्षा झाल्यात. भारताच्या लिंग गुणोत्तर प्रमाण2011नुसार हे 1000:943 आहे. पुढे हे प्रमाण आणखी वाढणार याचा अर्थ मुलांना मुली मिळणे कठीण होणार .याचाच फायदा घेत असंख्य घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहेत. कारण अपेक्षांच्या ओझ्याखाली ते भरडले जात आहे. मुलींना काही विपरीत घडल्यावरच कायदा अधिकार ,आंबेडकर, कलम 14 दिसते. असंख्य घटना केवळ 'स्त्रीशक्तीचा 'वापर करूनच घडत आहेत. कदाचित ' स्त्री स्वातंत्र्यम् अर्हता 'म्हणणाऱ्या भारतीय संस्कृतीला मारलेली ही एक चपराक आहे. उद्या हे प्रमाण नक्कीच वाढलेले असेल.

सिद्धांतानुसार व निसर्गनिमाप्रमाणे पुरुष गुण हे काटक, कठोर असतात.त्यांना शूरता आवडते.स्त्रियां कोमल, नाजूक , सौंदर्यभीरूची असतात. निरागसता हे सहज प्रवृत्तीचे गुण स्त्रियांमध्ये असतात. म्हणूनच जीवन जगताना उद्याच्या स्त्रीने समानतेचा पोरकटपणा करू नये. त्याची जाणीव तिला असावी.

यावर्षी पत्नी म्हणून 'मी गर्भवती' राहते. पुढील वेळ पतीची अशाही मागणी प्रकार घडला आहे. केवळ समानतेचे तत्व आधार घेऊन गोष्ट हास्यास्पद असली. तरी विचार करायला लावणारी आहे.आज असंख्य आपल्या बहिणी, माता केवळ सहीपुरते मर्यादित आहे. स्त्री कोट्यातूनच सरपंच पदासाठी तर वरच्या पदापर्यंत 'ती 'पुरती लेबल असते. सर्व कारभार पती नावाचा पुरुष सांभाळतो. मी कोण आहे ?who I am ? हे अजूनही तिने ओळखले नाही.मलाही एक व्यक्ती म्हणून जगायचे आहे. मी पण संसाररूपी रथाचे दोन चाकापैकी एक आहे. तोल सांभाळायचे सामर्थ्य त्याची जबाबदारी उद्याच्या स्त्रीमध्ये असावी प्रवाहात वाहून न जाता इतिहास हा वर्तमान काळातील आरसा आणि भविष्याचा वेध घेणार असतो म्हणून तिला तिच्या अवनितीस कोण जबाबदार आहे ? याची माहिती तिला असावी.अश्मयुगामध्ये मानव कंदमुळे शिकार जमा करून खायचा. शिकारीची, अन्न गोळा करण्याचे काम करायचा. स्त्री त्याला मदत करायची पुढे निसर्गगुणानुसार स्व हितासाठी, घर सांभाळाची जबाबदारी, धान्य अन्न रक्षणाची जबाबदारी तिने घेतली. रामायणाच्या काळात ही एका युद्धात दशरथाची कैकई( दोन नंबरची पत्नी ) सारथी बनली. रथाचे चाक निघणार अशा वेळेस तीने बोट घालून चाक सांभाळले. राजाचे बक्षीस म्हणून तिला वर दिला. त्यात त्या महाराणीने पुढे रामाला( सावत्र मुलगा ) वनवास मागितला. राम, सीता आणि लक्ष्मण 14 वर्षे वनवासात गेले. उर्मिला( लक्ष्मणाची पत्नी )मात्र तशीच राहिली. आजही अनेक उर्मिला उपेक्षितच राहिल्या. याला जबाबदार कोण ? सतीप्रथा सारख्या प्रथांना ही स्त्री जबाबदार होती असा उल्लेख शोधप्रबंधामध्ये आहे ( बौद्ध साहित्य ) त्याचे पुरावे आहेत. आजही हुंडाबळी स्त्रियांना बळी पडावी लागते. घरगुती हिंसाचारास ' सासू' नावाची महिलेचे रूप पुढे आले आहे.

' ती 'ही आपल्या मुलीसारखी आहे. ही भावना आपल्या मनात यावी. आजही एकतर्फी प्रेमातून ॲसिडच्या हल्ले होत आहे. मुले गुंड प्रवृत्तीकडे वळत आहे. याचाच अर्थ मुलांना अपुरे प्रेम... कारण पालकांना वेळ कमी मिळतो. कुठेतरी संस्कार कमी पडत आहेत म्हणून संस्काराची जपणूक उद्याच्या स्त्रियांनी आपल्याच पाल्यांना द्यावी. स्वतंत्र म्हणजे स्वैराचार नाही ही बाब पाल्यांना समजावी उद्या घटना घडणार नाहीत. कपडे वापरतानाही आपल्याला शोभेल असेच असावे अंग प्रदर्शन हा हेतू नसावा तो स्त्री-पुरुष दोघांनाही लागू आहे. मनुस्मृतीने आपल्यावर व्यक्ती असूनही अनेक बंधने लाभली म्हणून ती अमानुष प्रथांची जाचक नियमाची स्मृती पायदळी तुटवणे आपले जबाबदारी आहे. कोणत्याही प्रलोभनांना बडी न पडता आपण आपले रक्षक बनावे जेणेकरून उद्याची बीजे आजच रोवली जातील. बारा मंगळवार ,चौदा गुरुवार करून प्रश्न मिटत नसतात. डॉक्टर बाबासाहेबांनी आपल्याला सर्वच बाबतीत घटनेच्यारूपाने संरक्षण दिले.अनेक जाचक प्रथातून आपल्याला मुक्त केले. प्रसुती काळात रजा, पगार समान, राखीव जागा मात्र डोक्यात दुसरेच भोले बाबा याची जाणीव उद्यासाठी आजच असावी.

सावित्रीचे वाण घेतलेल्या स्त्रिया ह्या उद्यासाठी सज्ज आहेत. उद्याची आव्हाने पेलण्याचे बळ त्यांच्यात आहे. त्या नक्कीच यशस्वी होतील.

**आम्ही सावित्रीच्या लेकी**
**घडवू आम्ही नेकी**
**शिक्षण ज्ञान सावित्री वाण**
**देऊ आम्ही घरोघरी**
**ठेवू न कोणी बाकी**
**आम्ही सावित्रीच्या लेकी**
शेवटी यशस्वी भव !

**प्रसंजित नारायण तायडे**
**सहशिक्षक, जि. प. म. उ.शाळा पिंप्री खोद्री**

# आपेगाव -पैठण रस्त्यावरील काटेरी झुडपं आहे तशीच

## बांधकाम विभागाची उदासीनता



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथषष्ठीनिमित्ताने आपेगावमार्गे पैठणला शेकडो दिंड्या पाई जातात यानिमित्ताने मेन रोडवरील आलेल्या वेड्या बाभळी काढण्यात येते.
नाथषष्टी नियोजन बैठकीत संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी विविध खात्याच्या आधिकार्यांना कडक सुचना केल्या कि वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सोई सुविधा बाबत हायगय करू नका मात्र याबाबत बांधकाम विभागाच्या आधिकार्यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसुन येते दि. ९ गुरुवार रोजी तुकिरिम महाराज बिजेच्या मुहूर्तावर नाथषष्टीला सुरवात होते परंतु दोन दिवसावर येवुन ढेपलेल्या नाथषष्टी साठी पाई येणाऱ्या वारकऱ्यांच्या वाटेतील काटे काढण्याची अद्यापही बांधकाम विभागाने तसदी घेतली नसल्याने वारकर्यांना दिल्या जाणाऱ्या सोई सुविधाच्या नावाखाली नुसते पैसे खर्च होतात का या कडे जिल्हाधिकारी यानी लक्ष देणे गरजेचे आहे . राज्यातील लाखो वारकरी भाविक पैठण येथील शांतीब्रह्म संत श्री एकनाथ महाराज यांचा तीन दिवसीय नाथषष्ठी यात्रा महोत्सवाला येतात.

आवघ्या काही दिवसावर येऊन ठेपला आहे. शेकडो दिंड्या पायी प्रवास करत पैठणनगरीत दाखल होतात. पैठण ते शहागड रस्त्यालगत ठिकठिकाणी काटेरी झुडपे आसल्याने वारकर्यांना याचा त्रास होणार आहे.यात्रा सुरु होण्यापुर्वीच काटेरी झुडपे काढण्याचे आदेश पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी दिले होते मात्र आद्यापही काटेरी झुडपे काढली नसल्यामुळे काटेरी फांद्याचा फटका वारकर्यांना बसणार आहे. ही काटेरी झुडपे तोडण्यात यावीत, अशी मागणी वारकऱ्यांतून केली जात आहे.

# भरदिवसा गोळ्या झाडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वेल्हे तालुक्यात भरदिवसा एकाची अज्ञात व्यक्तीकडून गोळ्या झाडून



हत्या करण्यात आली आहे. गोळीबाराच्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गोळीबाराची माहिती मिळताच तात्काळ वेल्हे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. गोळीबारानंतर आरोपी पसार झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवनाथ उर्फ पप्पूशेठ रेणूसे ( रा. पाबे, रामवाडी ) असे गोळीबारात खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांच्यावर अज्ञातांनी गोळीबार केला आणि दुचाकीवरुन पळून गेले. यामध्ये गंभीर जखमी होऊन रेणूसे यांचा मृत्यू झाला. वेल्हे पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. घटनेची माहिती मिळताच वेल्हे पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होत घटनास्थळाचा पंचनामा केला रेणूसे यांच्यावर हल्ला केल्यानंतर हल्लेखोर दुचाकीवरुन पळून गेले आहेत. वेल्हे पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे. दरम्यान हा खून नेमका कोणत्या कारणामुळे करण्यात आला हे अद्याप समजू शकले नसून पोलीस यामागचा शोध घेत आहेत.

# करंजी फाट्याजवळ बस उलटली; सात जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** बामणी जवळील करंजी फाटा येथे 40 प्रवासी घेऊन जिंतूरकडे जाणारी बस अचानक पलटी झाल्याने या अपघातात सात जण जखमी झाले. यातील एकाची प्रकृती गंभीर असल्याने त्यास परभणी जिल्हा रुग्णालयात हलवले असून यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र बसचे एक लाखाच्या वर नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.
जिंतूर आगाराची बस सायखेडा हलटींग बस क्रमांक एम एच 20 बि.एल.0161 ही बस दि.8 मार्च, सकाळी 7 च्या सुमारास बस ड्रायव्हर बाळराज शेळके, कंन्डक्टर दत्तात्रेय कापुरे हे बस घेऊन सायखेडा ते जिंतूरकडे 40 प्रवासी घेऊन निघाली असता करंजी फाटाजवळ बसचा अपघात झाला. सदर बस पलटी होत



एका लिंबाच्या झाडाला जाऊन आदळली यामध्ये सात प्रवासी जखमी झाल्याची माहिती ग्रामस्थांनी बामणी पोलीसांना देताच पोलीस ठाण्यातील अधिकारी कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांच्या मदतीने बसमधील जखमींना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. असता जख्मी शोभाबाई चव्हाण वय 65 वर्ष रा.संवगी, लक्ष्मी चव्हाण वय 45 वर्ष रा.लिंबा,बन्सी राठोड वय 78 वर्ष दहीफळ घंदारे ता.मंठा, आसाराम पाईकराव वय 60 वर्ष रा.उम्ररद, विष्णू रामदास राठोड वय 40 वर्ष रा.सायखेडा, ओम राठोड वय 10 वर्ष, बेबी राठोड वय 35 वर्ष तीन्ही रा.सायखेडा आदीं जखमींवर वैद्यकीय अधिकारी डॉ. देविदास गरड रुग्ण सहाय्यक ढोणे, शेख अखिल आदींनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आला असून यातील एका प्रवाशाची प्रकृती खालवल्याने त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये हलवण्यात आले आहे सदर बसचे अपघात चालक शेळके यांच्या हाताला मुका मार लागला असून सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही, इतर प्रवाशांना मागुन आलेल्या वझर जिंतूर बस मध्ये बसवून बस स्थानकापर्यंत पाठवण्यात आले आहे. नेमके अपघात कशामुळे झाला ही माहिती मिळू शकली नाही.

या घटनेची माहिती आगरा व्यवस्थापक यांना मिळाल्यानंतर 11च्या सुमारास घटनास्थळी जाऊन जवळेकर व ड्रायव्हर, मेकानिक आदींच्या पथकाने घटनास्थळी जाऊन प्राथमिक पंचनामा केला असून या अपघातात एसटी महामंडळाचे तब्बल एक लाखाच्यावर नुकसान झाल्याचे बोलले जात आहे बातमी देईपर्यंत पोलिसात कोणती नोंद झालेली नव्हती.



# जागतिक महिला दिनानिमित्त फागणे गावात मोफत स्त्री रोग तपासणी, मार्गदर्शन शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**फागणे :** जागतिक महिला दिनानिमित्त फागणे गावात धन्वंतरी हॉस्पिटल व मयंकलॅब यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत विशेष स्त्री रोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात स्त्रीरोग, प्रसुतिशास्त्र व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. प्रियंका सुर्यवंशी व एम.एस. ( शल्य ) कन्सल्टिंग जनरल सर्जन डॉ. प्रशांत सुर्यवंशी यांनी महिला ग्रामस्थ व सरस्वती कन्या विद्यालयातील विद्यार्थिनीं ची आरोग्य तपासणी करत त्यांना योग्य मार्गदर्शन केले. तर मयंक लॅबचे संचालक भूषण सूर्यवंशी यांचे विशेष सहकार्य यावेळी लाभले. या आरोग्य शिबिरात मासिक पाळी संदर्भात उद्‌भवणाऱ्या समस्या, रक्ताची कमतरता, गर्भाशय व शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी, पोटाचे विकार, मुतखडा मुळव्याध, वंद्यत्व आधी समस्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रक्त व लघवी तपासण्यांवर मयंक लॅबच्या माध्यमातून विशेष सवलतही देण्यात आली. या शिबिराला असंख्य महिला व विद्यार्थिनींनी लाभ घेतला. याप्रसंगी फागणे ग्रामपंचायतीच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच विद्याताई पाटील, उपसरपंच विक्रम सूर्यवंशी,नगराज पाटील, मगन बाबा सूर्यवंशी, डॉक्टर विजय खैरनार, हरिचंद्र सूर्यवंशी, मंदा सूर्यवंशी, अमोल पाटील, रोजगार सेवक पितांबर पाटील, सरस्वती कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या पाटील, शिक्षिका साधना बेहेरे, प्रतिभा पाटील, जयश्री चव्हाण, विना रवंदळे, नलिनी चव्हाण, गौरव बडगुजर आदी यावेळी उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त कायदे व नियम विषयावर मार्गदर्शन शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** येथे बुधवार दि. 08 मार्च 2023 रोजी न्यु हायस्कूल पीरबावडा प्रशालेत जागतिक महिला दिनानिमित्त कायदे व नियम या बाबतीत शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शन शिबीरात वडोद बाजार पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संभाजीराजे खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जिवरग साहेब, पीरबावडा गावाचे तंटामुक्ती अध्यक्ष शिवनाथ गाडेकर, न्यू हायस्कूल पिरबावडा प्रशालेचे मुख्याध्यापक जी. एम. सोनवणे सर, जि. प. प्रा. शाळेचे मुख्याध्यापकबनकर सर, देविदास तुपे सर, डिगांबर बोकील, शंकर काळे, प्रशालेतील शिक्षिका श्रीमती एस. जी. पवार मॅडम, पंकज वाडेकर सर, सुनील अहिरे सर, रमेश घुगे तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आदिवासी भागातील नवागाम येथे बालविवाह जागृती अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण लक्षणीय आहे बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी विविध कायदे देखील अस्तित्वात आहेत. जिल्हा प्रशासन, न्यायपालिका यास आळा घालण्याचा प्रयत्न करीत आहे यासोबतच बालकल्याण समिती धुळे देखील कार्यरत आहे .बालकांविषयीचे विविध कायदे पोक्सो कायदा बाल लैंगिक शोषण कायदा याविषयीची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोचावी व धुळे जिल्हा बालविवाह मुक्त व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आदिवासी दुर्गम क्षेत्रात या कायद्या विषयी तसेच बालविवाहाच्या दुष्परिणामाविषयी जाणीव व्हावी यासाठी बालकल्याण समिती धुळे च्या माध्यमातून बालविवाह तसेच बालविवाहामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या यासोबतच बालकांचे हक्क, बालकांचे होणारे लैंगिक शोषण, बालके शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून आपण सर्वांनी घ्यावयाची काळजी याबाबत धुळे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'जाणीव जागृती ' अभियान राबवीत आहे. होळीका उत्सव धुळे जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागात मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो यासाठी उदरनिर्वाहाच्या निमित्ताने इतरत्र गेलेले आदिवासी बांधव मोठ्या संख्येने आपापल्या पाड्यावर येत असतात सातपुडा च्या पायथ्याशी शिरपूर तालुक्यात होळीची मोठी धूम असते संपूर्ण महिनाभर चालणाऱ्या होली का उत्सव मध्ये आदिवासी बांधव मोठ्या हीहिरीने सहभागी होत असतात. याच पार्श्वभूमीवर शिरपूर



तालुक्यातील बोराडी जवळील नवागाम- बुडकी येथे धुळे जिल्ह्यातील प्रथम मानाची आदिवासी पारंपारिक होळी साजरी केली जाते यासाठी महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातील बडवाणी, शेंदवा, खरगोन परिसरातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात हे लक्षात घेता बालकल्याण समितीने ( धुळे जिल्हा ) यांनी नवागाव बुडकी येथे भेट देऊन संवाद साधला. यावेळी उपस्थित अशी गट स्वरूपात बालविवाह व बाललैंगिक शोषण याविषयी चर्चा केली. मराठी काय झालं यावेळी बालकल्याण समिती धुळे अध्यक्षा डॉ.उषा साळुंके यांनी बालविवाहामुळे बालिकांचे होणारे शारीरिक नुकसान तसेच त्यामुळे या सर्वांचा समाजावर होणारा दुष्परिणाम याबद्दल माहिती दिली. बालकल्याण समिती सदस्य ॲडव्होकेट अनिता भांबेरे यांनी बालकल्याण समितीची भूमिका व बाललैंगिक शोषण या विषयावर संवाद साधला.नवागाव - बुडकीचे पोलीस पाटील लक्ष्मण पावरा, अनिल पावरा ग्राम पंचायत सदस्य, खंडू पावरा वन कर्मचारी, रमेश पावरा, जयदास पावरा, जितेंद्र पावरा, जूलाल पावरा, प्रदान पावरा ग्रामपंचायत सदस्य खिरदास पावरा तसेच सामाजिक कार्यकर्ते मनोज सोनवणे यांनी या जाणीव जागृती अभियानास सहकार्य केले.

# शिवाजीराव कर्डीले ठरले नगरच्या राजकारणातील 'किंग मेकर'

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** नगरच्या राजकारणात 'किंग मेकर' म्हणून ओळख असलेले भाजप नेते माजी मंत्री शिवाजी कर्डिले आणि आज नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अनपेक्षित बाजी मारली.
अचानक निवडणुकीत ट्विस्ट आणत कर्डिले स्वतः बँकेचे 'किंग' बनले आहेत. नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा अध्यक्षपदाची आज निवड होणार होती. या निवडीसाठी आज सकाळी अकरा वाजता संचालक मंडळाची विशेष सभा आयोजिण्यात आली होती. माजी आमदार चंद्रशेखर घुले यांचे नाव अध्यक्षपदासाठी आघाडीवर होते. मविआने चंद्रशेखर घुलेंची अध्यक्षपदासाठी नाव निश्चित केल्याने त्यांनी अध्यक्षपदासाठीचा उमेदवारी अर्जही भरला. पण अर्ज भरण्याच्या अखेरच्या मिनिटाला भाजपच्या वतीने अचानकपणे माजी आमदार शिवाजी कर्डिले यांचा देखील अर्ज आला. त्यामुळे या निवडणुकीत ट्विस्ट निर्माण झाला. एकीकडे चंद्रशेखर घुले यांचा एकच अर्ज आला असल्यामुळे त्यांचा निवडीचा जल्लोष सोशल मीडियावर सुरू होता. अचानक भाजपच्या वतीने अर्ज आल्याने आता कोण बाजी मारणार याकडे नगरवासियांचे लक्ष लागून राहिलं होते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदान घेतले. या मतदानामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार चंद्रशेखर घुले पाटील यांना नऊ मते मिळाली. भाजपचे माजी आमदार शिवाजी कर्डिले यांना दहा मते मिळाली. एक मतदार तटस्थ राहिल्याने या निवडणुकीत भाजपने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.





# जयश्री राऊत-भटकर यांना जिल्हास्तरीय आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने देण्यात येणारा आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार सोहळा नुकताच जालना जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात संपन्न झाला असून या वर्षीचा जिल्हास्तरीय आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार भोकरदन तालुक्यातील व राजुर येथील अंगणवाडी सेविका जयश्री रमेश राऊत-भटकर यांना प्राप्त झाला असून जालना जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्या हस्ते सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन जयश्री राऊत-भटकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य लेखाधिकारी राजू सोळुंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इंगळे साहेब, कृषी अधिकारी भीमराव डोंगरे, आरोग्य अधिकारी श्रीमती इराणी, कार्यकारी अभियंता श्रीमती राजहंस, उप मुख्यअधिकारी श्रीमती कोरे, बालविकास प्रकल्प अधिकारी जारवाल साहेब, सुपरवायझर अनुपमा मस्के, मुख्याध्यापक रमेश राऊत आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. अंगणवाडीचा दर्जा सुधारून अंगणवाडी सेविकामध्ये निकोप स्पर्धा निर्माण व्हावी या उद्देशाने हा पुरस्कार दिला जातो. अंगणवाडीचे सुशोभीकरण करणे, रेकॉर्ड अद्यावत ठेवणे, बालकांचे कुपोषण आणि मृत्यूदर कमी असणे, पालकास योग्य मार्गदर्शन करणे यासारख्या निकषांवर आधारित हा पुरस्कार दिला जातो. अंगणवाडी सेविका जयश्री राऊत-भटकर यांनी वरिष्ठ अधिकारी, सहकारी आणि ग्रामस्थांच्या सहकार्यातून राजूर येथील अंगणवाडी आदर्शवत ठेवण्याचा प्रयत्न केला म्हणून जिल्हा प्रशासनाच्या वतीने त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. त्याबद्दल सर्व स्थरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सुलतानपूर शाळेत महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथे जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम जि. प. के. प्रा. शा. सुलतानपूर शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला प्रसंगी छोट्या विद्यार्थ्यांनी धारण केलेल्या वेशभूषा करणाऱ्या मुलींच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यात इयत्ता पहिली ते सातवीच्या मुलींनी राजमाता जिजाऊ, झाशीची राणी, मिस वर्ल्ड, शिक्षिका, वकील, डॉक्टर इत्यादी कर्तबगार महिलांच्या वेशभूषा केल्या. प्रातिनिधिक स्वरूपात प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला. शाळेतील सर्व महिला शिक्षिकांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. यावेळी जमलेल्या माता पालक गटांसाठी मनोरंजक खेळ घेण्यात आले. संजय बुचुडे व वैशाली कंकाळ यांनी मार्गदर्शन केले. छाया सोनवणे, रेखा खरात यांनी खेळ घेतले.

आभार सविता राऊत यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पद्मा आधाने, परवीन बानो, नागमणी पेद्दी, मार्तंड चौधरी, मोहम्मद अनिस, हुमायून शेख यांनी सहकार्य केले. आदिती वेताळ, पूर्वी चव्हाण, आराध्या जाधव, बरीरा शेख, कार्तिकी बेलकर, श्रुती मालोदे, धनश्री पुरंदरे, आरुषी चव्हाण, सानिया शहा, अल्फिया मलंग, आयशा बिलाल या मुलींनी कार्यक्रमात आनंदाने सहभाग घेतला.



# फागणे ग्रा.पं.मध्ये महिला दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जगभरात आज जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातोय. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात आई, बहिण, बायको, मैत्रिण या रुपात महिलांचं प्रचंड मोठं योगदान असतं. महिलांचं समाजातील आणि कुटुंबातील योगदान साजरं करण्यासाठी खरंतर कोणत्याही एका दिवसाची आवश्यकता नाही. परंतू ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करून स्त्रियांविषयी आपल्या मनात असलेला आदरभाव, सम्मान व्यक्त करण्यासाठी दरवर्षी हा दिवस संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सर्व महिलांना आपल्या अधिकाराची जाणीव तसेच आठवण व्हावी आपले महत्त्व कळावे म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्या अनुषंगाने फागणे गावातील ग्रामपंचायतीच्या कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त थोर महिलांच्या प्रतिमेचे पूजन व सामुदायिक अभिवादन करून महिला दिवस साजरा करण्यात आला आहे. यावेळी प्रथम महिला लोकनियुक्त सरपंच विद्याताई पाटील , उपसरपंच विक्रम पाटील, ग्रामसेवक राहुल एन देवरे , नगराज पाटील, श्रीमती जयश्री विसपुते, कृषी सहाय्यक गायकवाड, ग्रा. सदस्य भालचंद्र पाटील, भोला पाटील, संजय धनगर , भूषण ठाकरे, कपिल पाटील, भिकन जाधव, सूर्यकांत पाटील, आधी ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी व फागणे यावेळी उपस्थित होते.



# सावळदबारा उधळण रंगाची करून धूलिवंदन व होळी उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे होळी व धुलीवंदनाचा सण नाचवून उत्साहात साजरा करण्यात आला. सावळदबारा दिसून येणारा एकोपा दर्शन पुन्हा धुलीवंदनाच्या कार्यक्रम व उत्सवानिमित्त दिसून आला. मारुतीरायाच्या मंदिरासमोर होळी पेटवून हा सण साजरा केला. दुसऱ्या दिवशी सर्व बालगोपाल मंदिरासमोर एकत्रित येऊन होळीच्या भोवती लहानथोर सामील होऊन पारंपरिक वाद्य, सनई ताफ्याच्या तालावर होळीभोवती फेर धरून नाचतात. दि.७/३/२३ मंगळवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून धुळड्याला खेळण्यास सुरुवात करण्यात आला. त्याचवेळी सूत्रधार पियुष कोते, योगेश खैरे व प्रमुख अंकुश कोलते यांनी त्यावर आधारित पदे व कवणे तालासुरात सादर केले. पाठीमागे साथ देणाऱ्या मंडळींनी तालावर म्हणून कार्यक्रमाची रंगत वाढविली. नंतर चक्रधर स्वामी मंदिर, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक अशी पूर्ण गावातून बालगोपालांनी एकमेकांच्या अंगावर रंग टाकत मोठ्या आनंदाने नाचत होते.तरुणांसाठी वाजंत्री मंडळींनी या निमित्ताने आनंदाच्या वातावरण निर्मिती करून घडवून आणली. तसे वातावरण तयार केले. यावेळी आकाश बावणे, आकाश कळसकर, गोलू पुजारी, शुंभम पुजारी, मिठ्या शिंदे, ऋषिकेश साळवे, महेश खडके, तुकाराम खराटे, विशाल शिप्पलकर, प्रतिक मोरे, शुंभम आप्पा, अक्षय खराटे, पंकज देशमुख व वाजंत्री कलाकार मंडळी समर्थ चव्हाण, अक्षय चव्हाण, आदी कार्यकर्ते व गावातील लहान मुले, तरुण, आबालवृद्धांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. रंगपंचमीमुळे सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसून आला. रंगपंचमीच्या मिरवणुकीचा आनंद घेतला.



# 23 जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** धुलीवंनाच्या सायंकाळी किरकोळ कारणावरून बोरी येथे दोन गटांमध्ये वाद होऊन परस्परविरोधी च्या फिर्यादीवरून बोरी पोलीस स्टेशन मध्ये वार मंगळवार 23 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आले. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की येथील माळी गल्ली मध्ये रहिवासी विशाल प्रसादराव घोलप यांच्या फिर्यादीवरून साक्षीदार महिलेस शिवगाळ का केली अशी विचारणा करत असताना बारा जणांनी संगमात करून साक्षीदारांनी फिर्यादीस लाठी काठी दगड व कोयता मारहाण महारण करुन शिवागाळ केली जखमी केली. म्हणून बारा जणांविरूद्ध गुन्हा दाखल गुन्हा रजिस्टर नंबर 41 / 2023 भादवि कलम 324, 323, 504 ,143, 147 148, 149 भादवी तर घरासमोर उभी असलेल्या महिलेचा हात धरून ओढले व जातिवाचक शिवगाळ करून थापड बुक्क्यांनी महाराणा केल्याप्रकरणी 11 जणाविरुद्ध गुन्हा दाखल फिर्यादी उषा सुधाकर कनकुटे वय 50 वर्षे यांच्या फिर्यादीवरून विनयभंग व अॅट्रॉसिटी गुना 11 विरुद्ध दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास पोलीस उपविभागीय अधिकारी गोफने हे करीत आहेत. मंगळवारी उशिरापर्यंत बोरी पोलीस ठाण्यामध्ये शेकडोंचा जमा उपस्थित होता त्या जमावस पांगवण्याकरता पोलीस प्रशासनाच्या वतीने राज्य राखीव दल तसेच पोलीस प्रशासनाने बंदोबस्त ठेवला होता.

# कार्यकारणभावाचे वैज्ञानिक पद्धतीशास्त्र गझलकाराला माहिती असावे

## डॉ. युवराज मानकर : आंबेडकरी गझल संमेलनात आंबेडकरी गझलवर गंभीर चिंतन

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** आंबेडकरी गझल ही बंडखोर आहे. तिचा मूळ स्वभाव बंडखोरीचा आणि सतत प्रवाहित राहण्याचा आहे. गझलेतील बंडखोरी ही जीवनातील कार्यकारणभावाचीच निर्मिती असते. गझल ही तंत्रशरण रचना असली तरी या तंत्रशरीरात जीवनाशायाचे अंतर्मन नसेल तर या तंत्र शरीराला काहीच किंमत नसते. गझलेच्या शरीरात जीवनमर्माचे अंतर्मन हेच गझलेच्या शरीराविरुद्ध बंडखोरी करून गझलचे नवे तंत्र निर्माण करू शकते. यासाठी कार्यकारणभावाचे वैज्ञानिक पद्धतिशास्त्र गझलकाराला माहिती असावे असे प्रतिपादन डॉ. युवराज मानकर यांनी केले ते अ.भा. आंबेडकरी साहित्य आणि संस्कृती संवर्धन महामंडळाच्या अमरावती येथे आयोजित आंबेडकरी गझल संमेलनात परिचर्चेतील प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. परिचर्चेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी कवी आणि गीतकार डॉ. सागर जाधव होते.

'आंबेडकरी गझलेमधून येणारी संविधानिक मूल्ये' या विषयावर बोलतांना आंबेडकरी गझलेचे अभ्यासक आणि समीक्षक डॉ. प्रकाश राठोड म्हणाले की, भारतीय संविधानाने या देशाला निळे इशारे दिलेले आहेत. या निळ्या इशाऱ्यांचा अन्वयार्थ सांगणारी गझल हीच खरी आंबेडकरी मूल्यांची गझल आहे. ही संविधानिक मूल्ये आंबेडकरी प्रतिभावंतांच्या गझलेमधून ठसठसीतपणे पुढे आलेली आहेत. सगळी यंत्रणा संविधानाच्या विरोधात उभी आहे.या देशाला हिंदुराष्ट्र करण्याची मोहीम सुरु झालेली आहे. बाबा बुवांचे प्राबल्य या देशात वाढले आहे. अशा गंभीर परिस्थितीत तुम्ही जर प्रतिभावंत असाल, लोक तुम्हाला गझलकार मानत असतील तर या धोक्याच्या बाबत तुम्ही आपल्या मंडळींना सजग करण्याची गरज आहे. ही जबाबदारी आंबेडकरी प्रतिभावंत म्हणून आपल्या सर्वांवर येऊन पडलेली आहे. ही जबाबदारी लक्षात घेऊनच आंबेडकरी गझलकारांनी लेखन करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.'आंबेडकरी गझलमधील



सौंदर्यदृष्टी' या विषयावर परिचर्चेत सहभाग नोंदवताना गझलकार डॉ. सिद्धार्थ भगत म्हणाले की , कविता हा प्रांत वेगळा मानला तर मराठी गझल हे एक छोटेसे बेट आहे. वामनदादा कर्डक यांचे कर्तृत्व उभ्या महाराष्ट्राला माहित आहेत. पण गझलकार म्हणून वामनदादांचे कर्तृत्व अगदी अलीकडे आपल्याला माहीत झाले आहे. वामन दादाच्या गझलेकडे आपले अक्षम्य दुर्लक्ष झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. परिचर्चेचा अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. सागर जाधव यांनी आंबेडकरी गझल कशी विकसित होत गेली याचा लेखाजोखा मांडला. आंबेडकरी गझलेच्या इतिहासातील वामनदादा कर्डक यांचे अमूल्य योगदान त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. परिचर्चेचे प्रास्ताविक संजय घरडे ,संचालन जगदीश भगत आणि आभार राजेश गरुड यांनी मानले. यावेळी संमेलनाध्यक्ष प्रमोद वाळके 'युगंधर' , अशोक बुरबुरे , डॉ.सीमा मेश्राम, महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांची विशेष उपस्थिती होती.



# 'दयानंद'चे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय नाव असणारे लक्ष्मीरमण लाहोटी यांचा वाढदिवसानिमित्त दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कांबळे, डॉ.ब्रिजमोहन दायमा, डॉ.बाळासाहेब चव्हाण, डॉ.गणेश लहाने, डॉ.विशाल वर्मा, डॉ.साईनाथ उमाटे, प्रा.शशिकांत स्वामी, डॉ.वैशाली सातपुते, ग्रंथपाल प्रा.विठ्ठल जाधव, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलूकर, ज्ञानेंद्र कातपुरे, अनिरुद्ध पळणीटकर आदींची उपस्थिती होती.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला सरपंच वंदनाताई पवार यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** येथे बुधवार दि. 8 मार्च जागतिक महिला दिना निमित्त चिंचोली लिंबाजी येथील महिला सरपंच श्रीमती वंदनाताई विलास पवार एक महीला सरपंच असुन चिंचोली लिंबाजी या गावाचा कारभार गेले दोन वर्षापासुन उत्कृष्ट पध्दतीने संभाळल्या बद्दल आज जागतिक महिला दिना निमित्त श्रीमती वंदनाताई विलास पवार यांच्या सर्व पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी उपस्थित सरपंच पती विलास पवार वंचितचे कार्यकर्ते तातेराव भुजंग , शिवसेनेचे शाखा प्रमुख ज्ञानेश्वर वाढेकर, स्व. रायभान जाधव विकास आघाडीचे कार्यकर्ते नवाब शेठ, सोसायटी सदस्य मनोज बावस्कर, सामाजिक कार्यकर्ते अमृत चौघुले यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



# मनसे जिल्हा अध्यक्ष सोळंके परतूर न. प. कर्मचाऱ्यांत जुंपली ?

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील पंढरपूर ते शेंगाव या दिंडी मागावर महाराजा



अग्रेसन चौकाचे सुशोभिकरणाच्या नावाने गुत्तेदार देविदानने १० लक्ष रुपयांचा उपहार केल्याचे प्रकरण सध्यातरी शहरात चांगलच गाजतय . परतूर येथील नगर परिषदेचे कर्मचारी एका कामासाठी सामान्य माणसाला अनेक चकरा मारायला लावतात मात्र गुत्तेदार देविदानच्या नावाने १० लक्ष उपहार केल्याची तक्रार मनसे नेते सोळंके यांनी देताच न.प. चे कर्मचारी गरबडीत झोपेतून जागे झाल्यासारखे उठले व रविवार या सुट्टीच्या दिवशीच खुलासा पत्र शोषल मिडीयाद्वारे सादर केले . ठिक आहे पण त्यावर आवक , जावक असावे का नाही ठिक आहे त्यावर अधिकृत नगर परिषेदेचा शिक्कातरी असावा असले काहीही नसताना खुलासा नुसता एका कागदावर खुलासा नोटीस असे छापून त्यावर प्रभारी अधिकारी यांची सही करूण जनतेला भ्रमीत करण्याचा प्रयत्न काही स्थानिक नेत्यांच्या म्हणण्यावर परतूर परिषेदेचे कर्मचारी करित आहेत. त्यावर मनसे नेते सोळके यांची पुन्हा आक्षेप करीत खुलास्यावर मुख्यअधिकाऱ्यांची सही खोटी आहे का असा प्रश्न एका व्हिडीओ दारे उपस्थित केला असून संबंधीत गुत्तेदार कर्मचारी यांची चौकशी व्हावी अन्यथा बेमुदत उपोषण करणार आहोत असे लेखी अंदोलन दिलेलेच आहे. त्यातर आम्ही मनसे सैनिक ठाम आहोत .

मात्र ते नगर परीषदेचे पत्र खरे कि खोटे हा पश्न उपस्थित होत आहे. यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा अध्यक्ष प्रकाश सोळंके म्हणतात की, ति खुलासा नोटीस म्हणजे देविदान यांना वाचविण्याकरीता बचाव बनाव नोटीस आहे. आणी ते हे प्रकरण जर खोटे असेल तर माझ्यावर मानहाणीचा पोलिसात गुन्हा नोंदवावा नगर परिषदेने दोषींवर कारवाई झालींच पाहीजे नाहीतर मनसे स्टाईल दाखवू शकतो असेही प्रकाश सोळंके म्हणाले .

# शेतकी खरेदी विक्री संस्थेवर शेतकरी विकास आघाडी पॅनलचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** ५ मार्च रोजी पार पडलेल्या जळगाव जामोद तालुका शेतकी खरेदी विक्री संस्थेच्या निवडणुकीमध्ये शेतकरी विकास आघाडी पॅनलचे वर्चस्व कायम राहिले.

सहकार नेते राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश सरचिटनीस श्री. प्रसेनजित दादा पाटील यांच्या नेतृत्वमध्ये शिवसेना ठाकरे गट,भाजप,वंचित बहुजन आघाडी या पक्षांनी सोबत राहून निवडणूक लढविली. एकूण 19 सभासद संख्या असलेल्या या संस्थेचे 13 संच्यालक आधीच अविरोध निवडूण आले होते.उर्वरित 6 जागांसाठी निवडणूक पार पडली. यामध्ये वसंतराव वारुकार यांना 1030. तुकाराम वाघ यांना 1014.गजानन उगले 1014. सुभाष तुरेरव कोकाटे 996.सुपडा ताकोते 994. हे 5 ही वैयक्तिक मतदार संघातील उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी झाले.तसेच इतर मागास प्रवर्गातील अनंत समाधान वाघ यांना 1041 मते मिळाली. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर शेतकी खरेदी विक्री संस्थेच्या निवडणुकीमध्ये विजयी झाल्याबद्दल सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी विकास आघाडी पॅनल चे प्रमुख प्रसेनजीत दादा पाटील,शिवसेना ठाकरे गटाचे सहसंपर्क प्रमुख दत्ताभाऊ पाटील,तालुका प्रमुख गजानन भाऊ वाघ,भाजपचे गजानन भाऊ सरोदे, तुकारामजी काळपांडे,विजू भाऊ काळे,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ,युवक जिल्हा कार्याध्यक्ष पराग अवचार, महादेव भालतडक, युवक विधानसभा अध्यक्ष दत्ता डीवरे,आशिष वायझोडे, पंजाब वाघ, व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. या निवडणुकीमध्ये खरेदी विक्री संस्थेचे माजी अध्यक्ष राजू बापू देशमुख, विठ्ठल वाघ, माजी अध्यक्ष सुभाष पाटील, माजी अध्यक्ष कैलास बापू देशमुख, संतोष गवई, अरुण पारवे, विजय भाऊ ठाकरे, बाळू भाऊ डीवरे, कृ. ऊ.बा. स.चे माजी संचालक देविदासजी पारसकर, रामेश्वरजी मानकर, गुणवंत वाघ, यांच्या मार्गदर्शनात कार्यकर्त्यांनी काम केले .

# महिलादिनी सफाई कामगार महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** समाजिक भान व जाणीव ठेवत तसेच सामाजिक बांधिलकी जपत येथील समाजकार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी व प्रमोद निकाळे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी बुधवार ( ता.०८ ) रोजी प्रातिनिधिक स्वरूपात काही सफाई कामगार महिलांना गुलाब पुष्प, शाल व कवी धोंडीराम राजपूत यांच्या पालखी नावाचे कविता संग्रह पुस्तक देऊन यथोचित सन्मान सकाळी साडे सात वाजता केला. सफाई कामगार महिला मंगलबाई त्रिभुवन, छाया बागुल, ज्योती त्रिभुवन, भाग्यश्री आल्हाट, अल्काबाई आव्हाड, शारदाबाई आस्वाले, रेखाबाई त्रिभुवन, ताईबाई त्रिभुवन यांचा सन्मान केला. आरंभी शिक्षणाची आराध्य दैवत सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेला मंगलबाई व ज्योती त्रिभुवन यांनी पुष्पहार टाकून अभिवादन केले. राजपूत यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत या सफाई कामगार महिलांनी कोरोना काळात स्वछता व सफाई बाबत दक्ष राहून कोरोना रुग्णांची केलेली सेवा याबद्धल त्यांचे अभिनंदन केले. तसेच



महिलांना स्वतः च्या आरोग्याची काळजी घेण्या बाबत मार्गदर्शन केले. मुलाबाळांना शिक्षण देण्याचे आवाहन केले. या प्रसंगी प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन, विष्णू आलूले, राहुल बनकर, कैलास त्रिभुवन, शेख अहमद, चेतन निखाडे, संजय त्रिभुवन, रमेश त्रिभुवन यांनी सहभाग नोंदविला.

# आ.नीलेश लंके यांच्या जन्मदिनी वारजे येथे लोकनेते महिला कुस्ती स्पर्धा

## पारनेरची कन्या पै.लावण्या गोडसे ठरल्या किताबाच्या मानकरी !

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** अल्पावधीतच आपल्या कार्य कुशल नेतृत्वाने प्रचलित झालेले पारनेर नगर विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादीचे आमदार आमदार निलेश लंके यांचा दहा मार्च रोजी होणारा वाढदिवस हा संपूर्ण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी विविध उपक्रमाद्वारे साजरा होत आहे .आमदार निलेश लंके यांच्यावर प्रेम करणारा चाहता वर्ग मोठ्या प्रमाणात राज्यभर पसरला आहे .त्याचाच एक भाग म्हणून आमदार लंके यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी लोकनेते महिला कुस्ती किताब 2023 चे वारजे पुणे येथे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये 70 मुलींनी सहभाग नोंदवून स्पर्धेची शोभा वाढवली. विजेत्याला मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे मानाची गदेसाठी पारनेर तालुक्यातील भाळवणी गावातील कन्या जिने आजवर अल्पवयातच कुस्ती क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटविला आहे अशी पै. लावण्या प्रमोद गोडसे या पैलवान कुमारीकेने पुणे जिल्ह्यातही आपल्या प्रक्षेणीय कुस्तीच्या माध्यमातुन घवघवीत यश संपादीत करत लोकनेता महिला कुस्ती किताब 2023 ची मानकरी ठरली आहे. पै. लावण्या गोडसे व पै सिद्धी घिसरे पुणे यांची मंगळवारी वारजे पुणे येथे झालेल्या स्पर्धेत अटीतटीची लढत झाली त्यात लावण्या गोडसे विजयी होऊन लोकनेते महिला किताब 2023 पटकावत मानाच्या गदेची मानकरी ठरली. पै.लावण्या गोडसे हिस NIS कुस्ती कोच किरणराव मोरे सर, महाकाल कुस्ती संकुल पीसोळी, पुणे यांचे मार्गदर्शन लाभले .




कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा राणीताई लंके ( जि प सदस्य नगर ) व मा रुपालीताई चाकणकर ( राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्ष ) यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून मा. अनिताताई इंगळे( जि प सदस्या पुणे ),मा . सायलीताई वांजळे ( मनपा सदस्य पुणे ),लक्ष्मीताई दुधाने ( मनपा सदस्य पुणे ),मा आरतीताई वांजळे ( सरपंच शिवणे ),मा हलिमाताई शेख( अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग पुणे ).कार्यक्रमाचे आयोजन मा आशाताई सुभाष वांजळे ( सरचिटणीस NCP पुणे ) व लोकनेते आमदार निलेश लंके प्रतिष्ठान पुणेचे पदाधीकारी हितचितक व शेकडो कुस्ती शौकिनांच्या उपस्थितीत ही स्पर्धा पार पडली. अमित दादा बैलभरे,मा पै निलेश भाऊ वांजळे,मा तुषार नरसाळे, अभयशेठ नांगरे,मा राज शिनारे, संगिताताई बैलभरे यांच्या सह रूपालीताई चाकणकर राणीताई निलेश लंके यांच्या हस्ते ही मानाची गदा देत कु. पैलवान लावण्या गोडसे हिस लोकनेते महिला कुस्ती किताब 2023 देत सन्मानित करण्यात आले.

# महिलादिनी योगवर्गातील साठ महिलांचा सन्मानपत्र देऊन गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या कार्याचा गौरव व्हावा, याउद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्थेतर्फे भुसावळ शहरातील सहा योग वर्गातील सुमारे साठ महिलांचा सन्मानपत्र व पुष्प देऊन गौरव करण्यात आला.

भुसावळ येथील जामनेर रोड लगत असलेल्या किरण लोखंडे यांच्या निवासस्थानी गेल्या काही वर्षांपासून योगिनी योग वर्ग सुरू आहेत. पतंजली योगपीठ हरिद्वारद्वारे संचलित आणि पतंजली योग समिती भुसावळ यांच्यातर्फे आयोजित योगिनी योग वर्गात महिलादिनी पहाटे सहा वाजता महिलांचा सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर योगिनी योग वर्गाच्या संचालिका महानंदा पाटील, किरण लोखंडे, संस्थेचे अध्यक्ष डी.के. पाटील, समन्वयक संजीव पाटील, सचिव डॉ. जगदीश पाटील, सदस्या सौ. सुरेखा पाटील, सौ. रंजना पाटील उपस्थित होत्या. प्रास्ताविकात संजीव पाटील यांनी संस्थेच्या विविधांगी उपक्रमांचा आढावा घेऊन डॉ. जगदीश पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित महिला दिन कार्यक्रमाचा हेतू सांगितला. महानंदा पाटील, डॉ. जगदीश पाटील, डी.के. पाटील, सौ. रंजना पाटील यांनी महिला दिनाविषयी माहिती दिली व महिलांच्या कार्याचा गौरव केला. योग प्रशिक्षक राजश्री बादशाह यांनी सत्कारार्थी महिलांच्या यादीचे वाचन केले. यानंतर संतधाम योग वर्ग, योगिनी योग वर्ग, ओंकार योग वर्ग, तेरापंथ योग वर्ग, जळगाव नाका योग वर्ग, लक्ष्मी नगर योग वर्ग अशा सहा ठिकाणच्या योगवर्गातील सुमारे साठ महिलांचा सन्मानपत्र व पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी योगिनी योग वर्ग संचालिका महानंदा पाटील, योग प्रशिक्षक वर्षा लोखंडे, अंजली वाघमारे, राजश्री बादशाह, मंदाकिनी केदारे, मीना राजपूत, हेमलता चौधरी, माला चौधरी तसेच योगवर्गाच्या सरिता बरडीया, पूनम सांखला, सरला निमानी, प्रणिता देशपांडे, प्रतिभा पाटील, शारदा धांडे, शीतल सावदेकर, पुष्पांजली बोंडे, पूजा चौधरी, अलका सपकाळे, राजश्री भारंबे, सीमा सैंदाणे, चेतना चौधरी, वंदना रत्नपारखी यांच्यासह महिलांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. जगदीश पाटील यांनी तर आभार योगिनी योग वर्ग संचालिका महानंदा पाटील यांनी मानले.



# पंढरपूर -मंगळवेढा मतदार संघातील विविध विकास कामांचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्राचे विकासरत्न आमदार मा. समाधानदादा आवताडे यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत मंजूर झालेल्या सभामंडपाचा लोकार्पण सोहळा व गोंदवले महाराज मठ या रस्त्याचे भूमिपूजन कृषी उत्पन्न बाजार समिती मंगळवेढा या संस्थेचे बेस्ट सभापती सोमनाथ आवताडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमासप्रसंगी बोलताना सभापती महोदय यांनी सांगितले की, पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाचा आणि प्रगतीचा ध्यास घेतलेले लोकनायक म्हणून आमदार महोदय यांची संपूर्ण जिल्ह्यामध्ये ओळख निर्माण झाली आहे. मतदार संघातील मूलभूत आणि पायाभूत बाबींचा धोरणात्मक विकास करण्यासाठी आमदार समाधान दादा आवताडे हे कोणताही राजकीय



आकस डोळ्यासमोर न ठेवता सर्व समावेशक निधीची तरतूद करण्यासाठी नेहमीच आग्रही असतात. गाव पातळीवर राजकीय अथवा गट तट यांचा झेंडा बाजूला ठेवून गावाचा कायापालट करण्यासाठी सर्वांनी एकदिलाने आणि एकविचाराने आमदार महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाची कास सुधारली पाहिजे असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.

आपल्या मतदार संघाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या रस्ते वीज पाणी शैक्षणिक सुख सोयी आरोग्य आदी बाबीसाठी भरगोस असा निधी आणून आपल्या मतदारसंघातील जनतेच्या विकास कामासाठी कुठेही कमी न पडता काम करत असून आपणही कुठल्या कामासाठी मागणीला कमी न पडता आपण आपल्या मागण्या करा आमदार साहेब यांच्या माध्यमातून आम्ही आपल्या गावाच्या विकासासाठी वचनबद्ध असो असे आवाहन यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे बेस्ट सभापती सोमनाथ मालक आवताडे यांनी केले. या कामाचे भूमिपूजन सभापती महोदय यांच्या हस्ते तर जेष्ठ नेते दिलीप भाऊ गुरव यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

सदर प्रसंगी सरपंच विलास मस्के, उपसरपंच उदय पवार, महेश दादा चव्हाण, विक्रम आसबे, सचिन आसबे, पांडूरंग देवमारे, अरुण बनसोडे, आश्विन बुरले, अजय जाधव, राहुल माने, ओंकार भोसले, योगेश रसाळ, संजय माळी, हनुमंत शिंदे, योगेश कांबळे, दत्ता घोडके, विजय भूमकर, नागू तात्या बनसोडे, विष्णू बनसोडे, गोपाळ म्हेत्रे, अमोल पाटील,आकाश चव्हाण, रवी केसकर, दत्ता पिसे, दिपक सुरावसे, रघुनाथ पवार, बबलू आसबे, मुकेश पंडित, महेश वावरे आदी उपस्थित होते.

अन्न वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत . परंतु अलीकडच्या आधुनिक काळामध्ये वाढता संपर्क व दळणवळणाच्या सुविधा या बाबी लक्षात घेता सुव्यवस्थित व दर्जेदार रस्ते बांधणी ही काळाची गरज बनली आहे . मतदार संघातील जनतेच्या या भौतिक सुविधांचा विचार करून आमदार समाधान आवताडे हे नेहमीच सहकार्य कौशल्याने आपली जबाबदारी व कर्तव्य पार पाडत असतात . आमदार अवताडे यांची ही विकासदृष्टी पंढरपूर व मंगळवेढा मतदार संघाचा चेहरा – मोहरा बदलण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शेतकरी व विद्यार्थी यांना नियोजन जागी पोहोचण्यासाठी खूप महत्त्वपूर्ण ठरणार आहे .
**राहुल माने, ग्राम पंचायत सदस्य गोपाळपूर**

